आंदोलन

वर्ष 16 | अंक 10 | मूल्य 25/-

शाश्वत विकासासाठी

मे 2025 | पृष्ठे 36

ते 'सुरुंग' लावत आहेत, आपण 'फुलं' वाटुया...
ते 'दरी' वाढवत आहेत, आपण 'पूल' बांधूया....



ते 'द्वेष' पसरवत आहेत... आपण 'प्रेम' फुलवत राहूया!
ते 'हिंदु-मुसलमान' आहेत, आपण 'माणुस' होऊया!

आंदोलन
शाश्वत विकासासाठी

जन आंदोलनांचा राष्ट्रीय समन्वयाचे
मासिक संवाद माध्यम

शाश्वत विकास न्यासाचा उपक्रम

वर्ष सोळावे, अंक दहावा
मे २०२५ ⌘ मूल्य रु. २५/-

- **संपादक**
  मेधा पाटकर
  संपादक मंडळ
  प्रा. सुभाष वारे, मीनल उत्तुरकर,
  अमेय तिरोडकर, सुनीती सु. र.,
  सुरेश सावंत, साधना दधीच,
  मिलिंद चंपानेरकर, राज असरोंडकर
- **कार्यकारी संपादक**
  संजय मंगला गोपाळ
  ९८६९९८४८०३
- **व्यवस्थापक**
  शरद जोशी
  ७०४५००३६४०
- **पत्रव्यवहार व वर्गणी पाठविण्याचा पत्ता**
  आंदोलन शाश्वत विकासासाठी
  द्वारा शरद जोशी
  बी/ ९, मेघमल्हार, गावंड पथ,
  मल्हार सिनेमा जवळ, नौपाडा,
  ठाणे (प.) ४००६०२
- **अक्षर मांडणी**
  पंकज गुरव
- **मुखपृष्ठ मांडणी**
  प्रतीक ठाकूर
- **मुखपृष्ठावरील छायाचित्रे**
  'आंदोलन'च्या संग्रहातून व इंटरनेटवरून
- **मुद्रणस्थळ**
  श्री गुरुकृपा प्रिंटर्स, माहिम, मुंबई - १६
- **शाश्वत विकास न्यासाचे कार्यालय :**
  द्वारा - ६, राघव, श्री रघुराज सोसायटी,
  सिंहगड रस्ता, पुणे ४११०३०

- दर महिन्याच्या १ तारखेला प्रसिद्ध होते.

कृपया वर्गणीचे दर वाढविण्यात आलेले आहेत

कार्यकर्ते/विद्यार्थ्यांना वर्गणीत सवलत मिळू शकेल.
खाली दिलेल्या ईमेल किंवा मोबाईलवर सवलतीसाठी संपर्क साधा.
आंदोलन शाश्वत विकासासाठीची वर्गणी भरा आता ऑनलाईन!

Name of A/c.: Andolan Shashwat Vikasasathi
Bank Of India, Naigaum Cross Road Branch, Dadar (East), MUMBAI 400014. Current A/c No.: 003520110001099, IFSC: BKID0000035
वर्गणी ऑनलाईन जमा केल्यानंतर खाली दिलेल्या ईमेल किंवा मोबाईलवर मेसेज करून लागलीच कळवा! ईमेल : andolan.magazine@gmail.com
मोबाईल : 9869984803/ 9869392013/ 7045003640

जन आंदोलनांचा राष्ट्रीय समन्वय - मराठी संवाद माध्यमाचा अंक - वर्ष २९ अंक ५

कार्यालय : आंदोलन शाश्वत विकासासाठी, द्वारा केमिकल मजदूर सभा, २९-३०, पहिला मजला, ए विंग, हाजी हबीब बिल्डिंग, नायगांव क्रॉस रोड, दादर (पूर्व), मुंबई - ४०००१४.

वार्षिक वर्गणी - व्यक्ती - रु. ३००/- संस्था - रु. ४००/-
१२ वर्षांची वर्गणी - व्यक्ती रु. ३,०००/- संस्था - रु. ४,०००/-

• आपण एकाहून अधिक वर्षांसाठी वर्गणी भरू शकता. • चेक/ड्राफ्ट 'आंदोलन शाश्वत विकासासाठी' ह्या नावाने काढावा.

• चेक/ड्राफ्ट/मनीऑर्डर ठाण्याच्या पत्त्यावरच पाठवाव्या.

संपादकीय

पहलगाम दहशतवादी हल्ल्याचा तीव्र निषेध! सामाजिक सलोखा राखण्याचे आवाहन!!

जनआंदोलनांचा राष्ट्रीय समन्वय, महाराष्ट्र

पहलगाममधील पर्यटकांवर झालेल्या निर्घृण हल्ल्याचा जनआंदोलनांचा राष्ट्रीय समन्वय तीव्र निषेध करत आहे व हल्ल्यात मारले गेलेल्या नागरिकांप्रती आदरांजली व त्यांच्या कुटुंबियांप्रती सहवेदना व्यक्त करत आहे. काश्मिरमधील निसर्गसौंदर्याचा आनंद घेत असणाऱ्या निशस्त्र नागरिकांवर झालेल्या या दहशतवादी हल्ल्याची त्वरित चौकशी व्हावी व दहशतवादाचा बिमोड करण्यासाठी कठोर कारवाई करण्यात यावी अशीही मागणी जन आंदोलनांचा राष्ट्रीय समन्वय करत आहे.

पहलगामच्या या दहशतवादी हल्ल्यामुळे काश्मीर खोऱ्यातील सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. आपल्या देशातील लष्कर खूप मोठ्या प्रमाणावर काश्मीर खोऱ्यात तैनात असताना अशा प्रकारचा हल्ला होणे हे गुप्तचर यंत्रणेचे अपयश मानायला हवे. तसेच कलम ३७० हटविल्यानंतर पुन्हा एकदा काश्मीरचे नंदनवन झाले आहे या सरकारच्या प्रचारावर विश्वास ठेवून पर्यटनासाठी काश्मीर खोर्‍यात परतलेल्या पर्यटकांना सुरक्षा यंत्रणा पुरविण्यात सरकार अपयशी ठरले आहे. आणि म्हणून सर्वात प्रथम देशाच्या गृहमंत्र्यांनी या हल्ल्याची जबाबदारी घेऊन तात्काळ राजीनामा द्यावा अशी मागणी जनआंदोलनांचा राष्ट्रीय समन्वय करत आहे.

स्थानिक नागरिक, सुरक्षा दल आणि प्रशासन यातील संवादाचा व समन्वयाचा अभाव या निमित्ताने समोर येत आहे. अशा प्रकारे सुरक्षा व्यवस्थेतील त्रुटी निश्चितच चिंताजनक आहे. देशांतर्गत निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर अशा प्रकारचा दहशतवादी हल्ला देशाच्या सार्वभौमत्वाला धोका पोहचवणारा आहे. पुलावामा हल्ल्याचा उल्लेख या संदर्भात पुरेसा बोलका आहे. पर्यटकांवरील दहशतवादी हल्ल्याचा उपयोग राजकारण्यांकडून धार्मिक ध्रुवीकरणासाठी होत असतानाच काश्मिरमधील सामान्य जनतेने निरपेक्षपणे केलेली मदत ही कश्मीरियत जपणारी आहे. हल्ल्याच्या ठिकाणी स्वत:च्या जीवावर उदार होऊन पर्यटकांचे जीव वाचवणारे व त्यांना सुरक्षित ठिकाणी पोहोचवणारे घोडेवाले व इतर स्थानिकांनी केलेल्या धर्मातीत मदतीला आम्ही सलाम करत आहोत.

जनआंदोलनांचा राष्ट्रीय समन्वय नेहमीच धर्मनिरपेक्षता आणि सामाजिक सलोखा जपण्याला प्राधान्य देत आला आहे आणि म्हणूनच या दहशतवादी हल्ल्याच्या पार्श्वभूमीवर देशात सामाजिक सलोखा कायम रहावा यासाठी प्रयत्न करण्याचे आम्ही आवाहन करत आहोत. धर्मनिरपेक्षता हे मूल्य जपणे ही शासनाची संविधानिक जबाबदारी आहे याची आठवणही या निमित्ताने आम्ही करुन देऊ इच्छितो.

पहलगाम हल्ल्याच्या निमित्ताने काश्मिरमधील स्थानिक नागरिकांनी कश्मीरियत जपत आपण भारतीय असल्याचे त्यांच्या कृतीतून स्पष्ट केले आहे. परंतु त्याचवेळी विविध राज्यातील काश्मिरी विद्यार्थ्यांना परत काश्मिरमध्ये पाठवण्याच्या बातम्यांनी जोर धरला आहे. अशा पध्दतीच्या वर्तनाचा आम्ही तीव्र निषेध करत आहोत. शिक्षण आणि नोकरी धंद्याच्या निमित्ताने देशभरात राहणारे काश्मिरी हे प्रथमत: भारतीय नागरिक आहेत आणि वरील हल्ल्याच्या त्यांच्यांवर परिणाम होऊ न देणे हे भारतीय नागरिक म्हणून आपले कर्तव्यच आहे. धर्मांध शक्तीच्या दबावाखाली न येता या कठीण काळात देशातील नागरिकांनी एकत्र राहणे ही काळाची गरज आहे.

टिप्पणी

हिंदी भाषेचे राजकारण नको, साने गुरुजींची आंतरभारती अंमलात आणा!

डॉ. संजय मंगला गोपाळ

पहिलीपासून हिन्दी भाषा सक्तीचा निर्णय महाराष्ट्र शासनाला अखेरीस मागे घ्यावा लागला! डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी भारताच्या संविधानात प्रत्येक व्यक्तीला स्वातंत्र्य, व्यक्ती – व्यक्तींमध्ये समता आणि व्यक्तिगत व सामाजिक व्यवहारात लोकशाही यांची सांगड घातली आहे. अत्यंत प्रतिकूल सामाजिक आणि आर्थिक परिस्थितीचा सामना करत बाबासाहेबांनी आपली ज्ञानलालसा प्रचंड मेहनतीने पूर्ण केली. शिका – संघटित व्हा – संघर्ष करा ही त्यांची समाजाला दिलेली त्री-सूत्री दिशा – दिग्दर्शक आहे. बाबासाहेबांनी जसे सामाजिक – आर्थिक – राजकीय क्षेत्रात भरीव काम केले तसेच शैक्षणिक क्षेत्रातही त्यांनी अनेक संस्था उभारून जन सामान्यांच्या शिक्षणाची हेळसांड होणार नाही याची काळजी घेतली. संविधानात शिक्षणविषयक तरतुदी केल्या तशाच भाषेबाबतही संतुलित भूमिका घेतली. उत्तरेतील नेत्यांचा आग्रह असतानाही हिन्दीची जबरदस्ती दक्षिणेच्या वा अन्य कोणत्याही अहिंदी भाषिक राज्यांवर करण्याचे त्यांनी निर्धाराने टाळले. आपल्या संविधानानुसार भारताची कोणतीही अधिकृत राष्ट्रभाषा नाही. हिन्दी, बंगाली, मराठी आदी २२ प्रादेशिक भाषांना शासकीय राजभाषेचा दर्जा दिलेला आहे. असे असतानाही विद्यमान राज्य सरकारने कशाचाही मुलाहिजा न बाळगता पहिलीपासून हिंदी भाषा विषय सक्तीचे फरमान सोडले.

नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणात, पहिल्या इयत्तेपासून त्री-भाषा सूत्र लागू करण्याचे निर्देश येऊन आता काही वर्षे उलटली. या नव्या राष्ट्रीय धोरणात फक्त त्री-भाषा सुत्राचा उल्लेख आहे. मातृभाषा किंवा अमूक एकच भाषा हवी, अशी सक्ती नाही. अशा परिस्थितीत, राज्यात त्री-भाषा सूत्र अमलात आणायचे झाल्यास काय धोरण ठरवावे, यावर व्यापक चर्चा, संबंधित अभ्यासक, शिक्षक, पालक यांच्या सोबत विचार विनिमय असे करत, सर्वांना सोबत घेत, सरकारला हे सूत्र आधीच ठरवता आले असते. लोकशाही व्यवस्थेत मुळात कोणताही निर्णय करताना, हेच अपेक्षितही आहे. मात्र सत्ताधाऱ्यांना नेमके हेच नको असते. कारण नवी कोणतीही योजना आणायची म्हटल्यावर त्या योजनेसोबत कोणकोणते राजकीय डावपेच लढवता येतील, कोणाकोणाचे हिशोब सेटल करता येतील, याचा विचार जाणीव पूर्वक होतो आणि मग अनेकदा योजनेची मूळ उद्दिष्टे आणि प्रत्यक्षात प्रस्तावित अंमलबजावणी यांचा दुरान्वयेही संबंध उरत नाही. हिन्दी भाषा सक्तीचेही असेच झाले.

देशात लोकसंख्येच्या प्रमाणात मतदार संघ आणि लोकसभेच्या राज्यनिहाय जागा नक्की करण्याचे घोषित झालेले आहे. केंद्रातील सत्ताधाऱ्यांच्या या डावपेचामुळे, आधीच उत्तरेतील राज्ये विरुद्ध दक्षिणेतील राज्ये असा संघर्ष सुरू झालेला आहे. यात भर म्हणजे नव्या शैक्षणिक धोरणातील त्री-भाषा सूत्रात हिन्दीची सक्ती चालणार नाही, असा पवित्रा दक्षिणेतील राज्यांनी घेतला आहे. त्यामुळे दक्षिण – उत्तर असा वाद अधिक टोकदार बनलेला आहे. या पार्श्वभूमीवर, दक्षिण आणि उत्तरेच्या मध्यावर असलेल्या महाराष्ट्र राज्याला खरे तर अधिक विवेकी भूमिका घेण्यास वाव होता आणि आहे. मात्र इथे डबल इंजिन सरकारच्या नावाखाली स्वतंत्र विचार, राज्याचे हित – अहित असा विचार करून मग राज्यहिताचा निर्णय असे करण्यापेक्षा, केंद्राची री ओढण्यात धन्यता मानणारे राज्यात सत्तेवर आहेत. त्यामुळेच यापूर्वी महाराष्ट्रातले वेदान्त फॉक्स सारखे प्रकल्प, काही केंद्र सरकारी कार्यालये राज्याबाहेर नेण्याच्या केंद्राच्या दट्ट्यासमोर, राज्य हिताच्या दृष्टीने ठाम उभे रहाण्याऐवजी त्यापुढे मान तुकवणारेच शासनात अधिक. यावेळी सर्व विरोधक एका सुरात ठाम राहिल्यामुळेच राज्य सरकारला निमूट माघार घ्यावी लागली! यातही अंतर्गत राजकारण काही पिच्छा सोडतांना दिसत नाही. मा. मुख्यमंत्री असे म्हणाले की इतका महत्वाचा निर्णय मला न विचारता का घेतला गेला? हे खरे असेल तर राज्यातील या तिघाडी सरकारातील तीन पक्षात अजूनही कसा बेबनाव आहे, हे दिसून येते. केंद्रात सत्ता असलेले आणि राज्यात सर्वाधिक जागा मिळवून मोठा भाऊ ठरलेले भारतीय जनता पक्षाच्या मुख्यमंत्र्यांचे

आपल्या मंत्रिमंडळावर आजिबात नियंत्रण नाही? की घोषणा अंगाशी आल्यावर मुख्यमंत्री आपले हात झटकून टाकण्यासाठी अधिकारी आणि संबंधित मंत्रीमहोदय व त्यांचा पक्ष यांचा बळी देत आहेत?

खरे तर राजापेक्षा त्याचा चेला अधिक आक्रमक अशी स्थिती. त्यामुळेच त्री-भाषा सूत्रात कोणतीही भाषा निवडण्याचे स्वातंत्र्य असताना, एकदम हिन्दीची सक्ती जाहीर करून उत्तरेतील राज्यांचा प्रभाव असणाऱ्या केंद्र सरकारातील नेत्यांना खुश करण्याचा प्रयत्न यात दिसतो. पुन्हा सतत वर्षाचे १२ महीने आणि ३६५ दिवस २४ तास इलेक्शन मोड मध्ये असणाऱ्या भारतीय जनता पक्षाने आपल्या छोट्या मोठ्या निर्णयाचा राजकीय लाभाशी सांधा जुळवण्याची खोड लावून घेतली आहे. लवकरच बिहार राज्याच्या निवडणुका आहेत. अनेक बिहारी नागरिक स्थलांतरीत मजूर म्हणून अन्य राज्यात गेलेले आहेत. त्यात महाराष्ट्राचा वाटा लक्षणीय आहे. त्यामुळे इथली हिन्दीची सक्ती तिकडे बिहार मध्ये मते मिळवण्यासाठी कामी येणारी आहे, असाही हिशोब केंद्रातील सत्ताधाऱ्यांनी केला असण्याची दाट शक्यता आहे. अर्थात, हे राजकारण उघडपणे व्यक्त करण्यासारखे नसल्यामुळे, किंबहुना असा कुणी आरोप केला तरी ते नाकारण्याचेच सोयीचे धोरण असल्यामुळे; प्रत्यक्षात या सक्तीचे समर्थन करताना शासन – प्रशासनातील धुरीणांनी तात्विक मांडणीचा आव आणला आहे. वास्तवात मात्र त्यांचे सर्व तर्क अत्यंत तकलादू होते. हिन्दी भाषा महाराष्ट्रात कानावर पडणारी आहे. दूरदर्शनवर मुले हिन्दी ऐकत असतात. हिन्दीची लिपी मराठी प्रमाणेच देवनागरी असल्याने, मराठी भाषिकांस समजण्यास व अक्षर ओळखीस सहज सुलभ आहे. सध्या पाचवी पासून हिन्दी सक्तीची आहेच मग पहिली पासून सुरू करण्याबाबत इतका गदारोळ कशाला? हिन्दी ही राष्ट्रभाषा आहे; ती देशात ६०% भागात बोलली जाते; तिला कुठेही विरोध होता नये; आदी युक्तिवाद सत्ताधारी करत होते.

अशा परिस्थितीत, राज्यातील यच्चयावत विरोधी पक्षियांनी आणि सत्ताधाऱ्यांच्या अगदी विरोधात नसले तरी सत्तेतही थेट वाटेकरी नसलेल्या पक्षांनी पहिलीपासून हिन्दी सक्तीच्या विरोधात दंड थोपाटले. बहुतेकांचा विरोध हिन्दी भाषेला नसून त्या भाषेच्या सक्तीला आणि ती सक्ती अगदी पहिल्या इयत्ते पासून करण्याला आहे. मराठी – हिन्दीची लिपी जरी सारखी असली तरी भाषा म्हणून त्यांचे नियम – व्याकरण पूर्णत: भिन्न आहेत. आजूबाजूला सर्वत्र हिंदीचा वावर आणि वापर हे वास्तव राज्यातील फार तर मुंबई सारख्या महानगरीत किंवा निजाम संस्थानाशी जोडलेल्या मराठवाड्यातील काही शहरात वा पूर्वी मध्यप्रदेशचा हिस्सा असलेल्या विदर्भातील काही भागांत असू शकतो. याउलट, शेजार राज्याच्या त्या त्या सीमेवरील भागातील मराठी भाषिकात गोवन, गुजराती, कानडी वा तेलगू भाषा ह्या हिन्दीपेक्षा अधिक जवळच्या आहेत. जे परप्रांतीय इथे आले आहेत त्यांच्यावर मराठीची सक्ती अधिक आवश्यक आहे, अशी भूमिका घेऊन या आधीच्या महाविकास आघाडीच्या सरकारने राज्यात सर्व माध्यमातील शाळांमध्ये मराठी अनिवार्य केलेली असताना, त्या धोरणाला हिन्दी भाषा सक्तीने सुरूंग लागेल, अशाने मायमराठी भाषेचे नुकसान होईल अशी साधार भीती विरोधकांनी व्यक्त केली आणि हिन्दी भाषेला नाही तर तिच्या सक्तीला उखडून टाकू असे त्यांना गरजावे लागले.

या सार्या गदारोळात, आज खरे तर आवश्यकता आहे साने गुरूजींच्या 'आंतरभारती' संकल्पना अंमलात आणण्याची ! ज्या साने गुरुजींनी दलितांना पंढरपूरच्या विठ्ठल मंदिरात प्रवेश मिळावा म्हणून ऐन स्वातंत्र्य दाराशी आलेले असतांना प्राणांतिक उपोषण करून राज्यभर अनेक मंदिरे मुक्त केली त्याच समाजवादी विचारांच्या दिवंगत स्वातंत्र्यसेनानी, लेखक, विचारवंत साने गुरुजींनी आंतरभारतीची संकल्पना मांडली आहे. स्वातंत्र्यानंतर १९४९ साली पुण्यात झालेल्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनात गुरुजींनी याबाबतचा ठराव मांडला होता. साने गुरुजींची ही आंतरभारतीची संकल्पना देशातील विविध प्रांतातील विविध भाषांमध्ये सांमजस्य निर्माण करणारी होती. विविध भाषा म्हणजे भारतमातेचे विविध अवयव आहेत वा भारतीय संस्कृतीची विविध रुपे आहेत, असे ते म्हणत. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर भाषावार प्रांतरचना अंमलात आल्यावर त्या त्या प्रांतातील कारभार त्या त्या भाषेत व्हावा, जेणेकरून प्रत्येकास आपली मातृभाषा वापरता यावी. यातून प्रत्येक भारतीय भाषेतील साहित्य, कला, संस्कृती आदी विषयक समृद्धी वाढून अस्मिता जागृत व्हावी, हे अपेक्षित होते. मात्र हे इष्ट घडत असताना, प्रांतीय भावना अतिरेकी बनू नये, तिचे पर्यवसान भारताच्या एकात्मतेला बाधक ठरू नये,

हे पहाणेही आवश्यक होते. त्यामुळेच भारतातील सर्व राजभाषा आणि असंख्य बोलीभाषा या भाषा भगिनी असून त्यांनी हातात हात घालून भारतीय संस्कृतीचा गोफ गुंफवित जावा, असे साने गुरुजींचे आंतरभारतीचे स्वप्न होते.

याबाबत साने गुरुजी म्हणत, ''भारताची संस्कृती एक आहे. प्रांता – प्रांतात थोडेफार फरक असतील, परंतु तेव्हढ्याने ती भिन्न होत नाही. तुकारामाच्या अभंगात, नारसी महतांच्या भजनात, रवींद्रनाथांच्या गीतांजलीत, बसवण्णांच्या वाचनांत, एकाच संस्कृतीची ध्येये दिसून येतात. भारतीय संतांनी आणि आचार्यांनी भारतीय संस्कृती एकरूप केली. नामदेवाचे अभंग शिखांच्या धर्मग्रंथात जातात. कबिराची गाणी आणि डोहे, मीराबाईंची उचंबळणारी गीते, गोपीछंदाची गाणी सर्व हिंदुस्तानभर गेली आहेत. फुलाच्या अनेक पाकळ्या म्हणजे प्रांतीय संस्कृती. म्हणूनच मी म्हणतो की, भाषा वेगवेगळ्या असल्या तरी भारतीय संस्कृती एकच आहे. परंतु एकदा कोठे शुद्धीच्या नावावर हकालपट्टी सुरू झाली की ती कोठे थांबेल सांगता येत नाही. मग बंगाल्याने बिहारीला 'चले जाव' म्हणायचे, बिहारीने बंगाल्याला! कानडी बंधूंनी महाराष्ट्रीयांना, महाराष्ट्रीयांनी गुजरात्यांना! तामिळांनी तेलगूंना बंधूंना, तेलगू बंधूंनी कानडी बांधवांना! आज हे जे असिहष्णू प्रकार होत आहेत, ते कोण थांबवणार? आपणच याला आळा घालूया. कसा घालता येईल आळा? परस्परांची भाषा जाणून घेऊन, अभ्यासून, त्यांचा आदर करून! भाषा अहंकारासाठी नसून हृदयाला पोहोचण्यासाठी आहे. भाषेची अस्मिता असली तरी तो एक संवादाचा मार्ग आहे. ती ती भाषा कानावर पडली तर भावाची भाषा भेटली म्हणून नाचावे, थोडे थोडे शब्द येत असावेत, गाणी येत असावीत. चांगले साहित्य आपल्या भाषेत भाषांतरित करून घ्यावे. त्यांचा आनंद घ्यावा".

साने गुरुजींच्या या संकल्पनेतील 'आंतरभारती अनुवाद सुविधा केंद्र' कोकणातील माणगाव जवळ ३६ एकराच्या निसर्गरम्य परिसरात उभारलेल्या साने गुरुजी राष्ट्रीय स्मारकात गेली सुमारे २५ वर्षे फुलते आहे. विविध भारतीय भाषांत अनुवादाचे आदान प्रदान इथे होते. दर वर्षी उत्कृष्ट अनुवादीत ग्रंथाला पुरस्कार देण्यात येतो. महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसाठी अनुवाद कार्यशाळा होतात. अशाच प्रकारे देशभर सर्व शाळांमध्ये वा आंतरभारती केंद्रात विद्यार्थ्यांसाठी सर्वभाषिक वा बहुभाषिक शिक्षक असावेत. विद्यार्थ्यांना हव्या त्या भाषा शिकण्याची जशी सोय हवी तशीच विविध भाषांमध्ये अधिक समन्वय, देवाणघेवाण, साहित्याचे विविध भाषांमध्ये भाषांतर याची स्वाभाविक सोय तिथे असावी. कोणत्याही भाषेच्या सक्तीपेक्षा विविध भाषा, त्यातील गाणी, संगीत, कला कानावर पडण्याची पहाण्याची सोय असावी व त्यातून विद्यार्थ्याला आपल्या आवडीनुसार हवी ती भाषा शिकण्याची सोय असावी. नव्या शैक्षणिक धोरणातही हेच अनुस्यूत असावे. हिंदी भाषेच्या सक्तीचे राजकारण करण्यापेक्षा, सर्वांनी मिळून साने गुरुजींची आंतरभारतीची संकल्पना अंमलात आणणेच योग्य ठरेल. बाबासाहेबांच्या स्वप्नातला एकात्म भारत त्यातूनच निर्माण होईल!

sansahil@gmail.com
9869984803

हैदराबाद संमेलन वृत्तांत

गेल्या मार्च महिन्यात हैदराबाद येथे झालेल्या NAPM चा राष्ट्रीय संमेलनाच्या गेल्या अंकातील वृत्तांतात जे वृत्तांत समाविष्ट होऊ शकले नाही ते या अंकात आहेत. संमेलनात झालेल्या गट चर्चांचे अहवाल **वैभवी, डॉ. सुहास कोल्हेकर** व **मीनल उत्तुरकर** यांनी तयार केले आहेत.

वर्गणी नियमित भरा,
जन आंदोलनांना हातभार लावा!

आंदोलन मासिक जन सहभागातूनच चालते. कोणतेही अनुदान नाही. तरी वाचकांनी आपली वर्गणी नियमित पाठवत रहा! वर्गणी ठाणे पत्त्यावरच पाठवा! वर्गणी online पाठवण्यासाठी तपशील पान २ वर पहा!! वर्गणी पाठवल्यावर **९८६९९८४८०३** या नंबर वर WhatsApp मेसेजवर कळवा!!!

\- शरद जोशी, व्यवस्थापक

निवेदन

आरोग्य अधिकारा संदर्भात मा. मुख्यमंत्र्यांना NAPM चे पत्र

प्रति,
माननीय मुख्यमंत्री,
महाराष्ट्र राज्य

विषय: सर्वांसाठी आरोग्याच्या अधिकाराची कायदा/कायदेशीर तरतुद, योग्य बजेट वाटप, प्रभावी सार्वजनिक आरोग्य सेवा, आणि राज्यातील खाजगी व कॉर्पोरेट आरोग्य सेवांचे नियमन.

माननीय महोदय,

आम्ही, खाली स्वाक्षरी केलेले सामाजिक कार्यकर्ते, राष्ट्रीय आरोग्य अधिकार समन्वयाच्या वतीने तुम्हाला हे पत्र लिहित आहोत. राष्ट्रीय आरोग्य अधिकार समन्वय हा जनआंदोलनांचा राष्ट्रीय समन्वय (NAPM)चा देशव्यापी उपक्रम आहे, ज्याचा उद्देश देशातील सर्व लोकांसाठी आरोग्याचा अधिकार सुनिश्चित करणे हा आहे. गेली अनेक वर्षे आणि दशके, आमच्या अनेक सहकाऱ्यांनी हे सातत्याने स्पष्ट केले आहे की, आरोग्याचा अधिकार हा भारतीय राज्यघटनेच्या कलम २१ अन्वये सन्मानाने जीवन जगण्याच्या अधिकाराचा अविभाज्य आणि आवश्यक भाग आहे.

तुम्ही मान्य कराल की कोणत्याही राष्ट्राची किंवा राज्याची सामाजिक आणि आर्थिक प्रगती तेव्हाच शक्य असते जेव्हा तेथील लोक आणि समुदाय निरोगी असतात. त्यामुळे संपूर्ण जनतेला दर्जेदार आणि सार्वत्रिक आरोग्य सेवा पुरविण्याची संपूर्ण जबाबदारी सरकारने घेणे अत्यंत आवश्यक आहे. तरच आपण स्वातंत्र्याची ७५+ वर्षे खऱ्या अर्थाने साजरी करू शकू. या संदर्भात, आम्ही ७ एप्रिल (जागतिक आरोग्य दिन) ते १४ एप्रिल (आंबेडकर जयंती) या कालावधीत 'आरोग्य हक्क सप्ताह' साजरा करत आहोत. या निमित्ताने 'सार्वजनिक आरोग्य आणि स्वच्छता', 'रुग्णालये' आणि 'दवाखाने' हे राज्यघटनेच्या राज्य सूची (सूची २, विषय ६) अंतर्गत येतात हे लक्षात घेऊन या पत्रात आम्ही आमच्या समस्या, अपेक्षा आणि मागण्या तुमच्यासमोर मांडत आहोत.

आरोग्याच्या अधिकारासाठी कायदेशीर चौकट निश्चित करणे आवश्यक आहे. सार्वत्रिक आरोग्य हक्कांसाठी राज्य सरकारने ताबडतोब कायदा आणण्याचा विचार करावा, अशी आमची मागणी आहे. राजस्थानचा 'आरोग्य हक्क कायदा, २०२३' हे या दिशेने एक महत्त्वाचे उदाहरण आहे, ज्याकडे गांभीर्याने पाहिले पाहिजे. परंतु हा कायदा प्रामुख्याने आरोग्य सेवांपुरता मर्यादित आहे. आपल्या राज्यात आम्हाला असा कायदा हवा आहे जो सर्वसमावेशक असेल - आणि आरोग्याच्या अधिकाराची खात्री देईल. सर्व कामगार वर्ग आणि उपेक्षित समुदायांच्या, ज्यात आदिवासी, दलित, बहुजन, धार्मिक अल्पसंख्याक, स्त्रिया, ट्रान्सजेंडर, क्विअर्स, नॉन-बायनरी व्यक्ती, अपंग व्यक्ती, विमुक्त आणि भटका समुदाय आणि मुलांसह समावेश असेल, आरोग्याचा अधिकार सुनिश्चित करण्यासाठी विशेष आणि ठोस उपाययोजना कराव्यात अशी आमची आग्रही मागणी आहे.

संबंधित नागरिक, सामाजिक कार्यकर्ते आणि जनसंघटना म्हणून आम्ही आमच्या राज्यासाठी विधेयकाचा मसुदा तयार करण्याच्या प्रक्रियेत योगदान देण्यास तयार आहोत. हे विधेयक केवळ आरोग्य सेवेचा अधिकार निश्चित करणार नाही, तर हेही सुनिश्चित करेल की, स्थानिक विविधता, संदर्भ आणि अभिरुचीनुसार तयार केलेले सुरक्षित, पौष्टिक आणि पुरेसे अन्न; राहण्यासाठी आणि काम करण्यासाठी स्वच्छ, हवेशीर आणि प्रदूषणमुक्त ठिकाणे; प्रत्येकासाठी तसेच पशुपालनासाठीही सुरक्षित पिण्याचे पाणी; आणि स्वयंपाक, कपडे धुणे, स्वच्छता यासारख्या घरगुती गरजांसाठी नियमित दैनंदिन पाण्याचा पुरवठा या आरोग्याच्या प्रमुख सामाजिक निर्धारकांच्या उपलब्धतेची जबाबदारी सार्वजनिक यंत्रणा घेतील. कोविड-१९ महामारी आणि अचानक लॉकडाऊनमुळे असे 'आरोग्याचे सामाजिक कारक' किती महत्त्वाचे आहेत हे स्पष्ट झाले आहे.

यासाठी संबंधित विविध विभाग आणि सार्वजनिक आरोग्य

विभाग यांच्यात प्रभावी आंतर-विभागीय समन्वय आवश्यक आहे. आम्ही तुम्हाला वैयक्तिक स्वारस्य घेण्याची, तुमच्या मार्गदर्शनाखाली अशा आंतर-विभागीय समन्वयाची स्थापना करण्याची आणि सर्व संबंधित नियामक संस्थांना लोकाभिमुख रीतीने कार्य करण्यास सक्षम करण्याची विनंती करतो.

शेतकरी, बांधकाम कामगार, घरगुती कामगार, मासेमारी करणारे समुदाय, खाण कामगार, वीटभट्टी कामगार आणि इतर अनेक क्षेत्रातील असंघटित कामगारांसह भारतातील कामगार वर्गाच्या व्यावसायिक आरोग्याच्या समस्यांकडे आरोग्य यंत्रणेने दीर्घकाळ दुर्लक्ष केले आहे. मालकांवर स्पष्ट आणि कठोर नियम लागू करणे आणि कामगारांसाठी विशेष आरोग्य सेवांच्या मजबूत तरतूदीसह - ठोस आणि प्रभावी प्रतिबंधात्मक उपाय योजले पाहिजेत. राज्यातील सर्व कामगारांचे व्यावसायिक आरोग्य स्थितीची तपासणी करण्यासाठी व ती बळकट करण्यासाठी ठोस कृती आराखडा सुचवण्यासाठी राज्य सरकारने समिती स्थापन करावी, अशी आमची मागणी आहे.

आरोग्याकडे सर्वांगीण पणे पाहिले पाहिजे असे आमचे मानणे आहे. या आधारावर आमची विनंती आहे की, सार्वत्रिक आरोग्य सेवांसोबतच प्राथमिक आरोग्य केंद्रांमधील मानसिक आरोग्य सेवांचाही सार्वजनिक आरोग्य व्यवस्थेत समावेश अनिवार्यपणे करावा. याव्यतिरिक्त, सामाजिक आणि सांप्रदायिक सौहार्द, तणावमुक्त आणि सुरक्षित कार्यस्थळे आणि सुरक्षित सार्वजनिक वाहतूक, एक निरोगी आणि सर्वसमावेशक समाज निर्माण करण्यात निर्णायक भूमिका बजावते. राज्य सरकारने केवळ शारीरिकच नव्हे तर प्रत्येकाचे मानसिक आणि सामाजिक आरोग्य सुनिश्चित करणे अपेक्षित आहे.

आरोग्य क्षेत्रातील हवामान संकट, सतत वाढत जाणारे तापमान आणि उष्णतेच्या लाटा, तसेच अचानक आणि अवकाळी पाऊस किंवा गंभीर दुष्काळ आणि परिणामी तीव्र जलसंकट यामुळे उद्भवणारे पूर ही उदयोन्मुख आव्हाने पाहता सार्वजनिक आरोग्य यंत्रणा मजबूत आणि सक्षम करणे निकडीचे झाले आहे. हवामान संकटाचे शेतीवर होणारे परिणाम आणि जैवविविधतेचे नुकसान यामुळे भविष्यात गंभीर अन्न संकट उद्भवू शकते. त्यामुळे आपली नैसर्गिक संसाधने आणि परिसंस्था यांचा सतत नाश करणाऱ्या कॉर्पोरेट-अनुकूल आणि विध्वंसक विकास मॉडेलचे पुन्हा परीक्षण करणे आवश्यक आहे.

खालील पावले त्वरित उचलणे आवश्यक आहे:

❑ सार्वजनिक आरोग्याच्या पायाभूत सुविधा बळकट कराव्यात आणि जिल्हा रुग्णालयांचे खाजगीकरण त्वरित थांबवावे.

❑ सर्व स्तरावरील डॉक्टर, परिचारिका व इतर आरोग्य कर्मचाऱ्यांची रिक्त पदे भरण्यात यावी.

❑ कॉर्पोरेट आणि खाजगी आरोग्य सेवांवर कठोर आणि प्रभावी नियमन लादले जावे.

❑ सार्वजनिक आरोग्य व्यवस्थेत दर्जेदार औषधांची मोफत उपलब्धता सुनिश्चित करावी आणि ते माफक दरात बाजारात मिळायला हवे.

❑ आशा कामगारांच्या श्रमाला मान्यता देऊन त्यांची नियुक्ती नियमित कर्मचारी म्हणून करण्यात यावी.

❑ आरोग्य क्षेत्रात कंत्राटी पद्धतीवर बंदी घालावी.

❑ राष्ट्रीय अन्न सुरक्षा कायदा, २०१३ (NFSA) नुसार अन्न सुरक्षेचा अधिकार सुनिश्चित केला पाहिजे; अंगणवाड्या आणि मध्यान्ह भोजन व्यवस्था सक्षम करावी; या मध्ये गरम शिजवलेले अन्न, अंड्यांसह, उपलब्ध करून देण्यात यावे; रेशनची आंतरराज्यीय पोर्टेबिलिटी आणि कायद्यांतर्गत इतर अधिकार मजबूत केले पाहिजेत; फोर्टीफाईड तांदळाचा पुरवठा थांबवावा आणि भरड धान्य (ज्वारी, बाजरी इ.) यांचा समावेश करावा.

❑ जात, धर्म आणि लिंगावर आधारित भेदभाव दूर करून सर्वांना समान व न्याय्य आरोग्य सेवा मिळाव्यात.

वरील सर्व उपायांसाठी पुरेशा अर्थसंकल्पीय तरतुदी आवश्यक आहेत. त्यामुळे आरोग्य बजेट तत्काळ दुप्पट करावे, अशी आमची मागणी आहे, आणि राज्यघटनेच्या राज्य धोरणाच्या निर्देशात्मक तत्त्वांनुसार टप्प्याटप्प्याने त्यात वाढ करून, ५-६% पर्यंत केले पाहिजे. राज्यात 'आरोग्य हक्क' कायदा आणण्याच्या प्रक्रियेला गती देण्यासाठी आणि 'आता सर्वांसाठी आरोग्य' याची तजवीज करण्यासाठी तुम्ही तातडीने प्रयत्न कराल अशी अपेक्षा आहे. आम्ही, जनआंदोलनातील आणि तळागाळातील कार्यकर्त्यांच्या रूपाने, या प्रक्रियेत मदत करण्यास

(पान ३१ वर)

खास वृत्तांत

भारत आपल्याला कसा हवाय, कोणत्या संकल्पना आपण मानत नाही!

वैभवी प्रेमलता संजय आढाव

अधिवेशनाच्या पहिल्या दिवशी शेवटच्या सत्रात 9आपल्याला देश कसा हवाय, कुठले विचार आपण नाकारातोय!9 या महत्त्वाच्या विषयावर सुप्रसिद्ध माहिती अधिकार कार्यकर्त्या अरुणा रॉय यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या परिसंवादात देशभरात सामाजिक, राजकीय समस्यांवर मुलभूत कार्य करणारे जेष्ठ सामाजिक कार्यकर्ते सहभागी झाले होते. त्या परिसंवादाचा हा संक्षिप्त अहवाल.

सत्यासाठी, न्यायासाठी आणि समानतेसाठी बोलत राहणं गरजेचं - पद्मश्री शांता सिन्हा

बालमजुरी विरुध्द तीव्र संघर्ष करत तेलंगणातील रंगा रेड्डी जिल्ह्यातील जवळपास १ २ ० ० गावांमधील बाल मजुरीमध्ये अभूतपूर्व घट करण्याचे अतुलनीय कार्य करणार्या **पद्मश्री शांता सिन्हा** यांनी आपल्या भाषणात लोकशाही, समानता, स्वातंत्र्य आणि बंधुता यांचं महत्त्व स्पष्ट केलं. त्यांनी लोकशाहीची व्याख्या करताना सांगितलं की, लोकशाही म्हणजे प्रत्येकासाठी समान हक्क, न्याय आणि बंधुता. लोकशाही केवळ एका संकल्पनेपुरती मर्यादित नसून ती प्रत्यक्ष कृतीत उतरली पाहिजे. त्यांनी नमूद केलं की, इथे बसलेले प्रत्येक जण लाखो लोकांच्या संघर्षाचे प्रतिनिधित्व करत आहेत. ह्या लोकांनी आपल्या स्वप्नांची गुंतवणूक करून लोकशाही मजबूत करण्यासाठी मोठी लढाई लढली आहे. त्यांनी असंही सांगितलं की, संविधानाने दिलेले हक्क टिकवण्यासाठी आपण एकत्र राहायला हवं आणि लोकशाहीच्या मूलभूत तत्वांवर आधारित देशाची कल्पना पुढे न्यायला हवी.

त्यांनी गांधी, नेहरू आणि आंबेडकर यांच्या भारताच्या कल्पनेचा उल्लेख करत सांगितलं की स्वातंत्र्यानंतर मिळालेल्या हक्कांसाठी अजूनही संघर्ष करावा लागत आहे. ७५ वर्षांत कामगार वर्गाने अनेक हक्क मिळवले, परंतु ते टिकवणं ही मोठी जबाबदारी आहे. शांता सिन्हा यांनी धार्मिक ध्रुवीकरण आणि त्याचा समाजावर होणारा परिणाम यावरही भाष्य केलं. त्यांनी सांगितलं की, आज धर्माचं राजकारणासाठी शस्त्रीकरण केलं जात आहे. रामाला हत्यारबंद देवतेप्रमाणे सादर केलं जात आहे. परंतु खरा राम हा करुणा आणि प्रेमाचं प्रतीक आहे. यामुळे समाजात द्वेष वाढतो आणि मुळ मुद्दे दुर्लक्षित होतात.

त्यांनी स्पष्ट केलं की आजचं वातावरण भांडवलशाहीला सोयीचं आहे. दलित, आदिवासी, अल्पसंख्याक, महिला आणि पारलिंगी लोकांच्या समस्या दुर्लक्षित करण्यासाठी, धार्मिक आणि जातीय संघर्ष उभे केले जात आहेत. यामुळे गरीब, कामगार आणि वंचित वर्गाच्या मूलभूत हक्कांकडे दुर्लक्ष होत आहे. शांता सिन्हा यांनी संविधानाच्या संरक्षणासाठी प्रत्येक गाव आणि जिल्ह्यात बैठक घेण्याचं आवाहन केलं. त्यांनी सांगितलं की सत्य बोलताना आपण थकता कामा नये. सत्यासाठी, न्यायासाठी आणि समानतेसाठी बोलत राहणं गरजेचं आहे.

भारतीय राष्ट्रवाद समता, बंधुता आणि विविधतेच्या स्वीकारावर आधारलेला – इरफान इंजिनियर

9सेंटर फॉर स्टडी ऑफ सोसाइटी एंड सेक्युलरिसम9या सांप्रदायिक सद्भाव संदर्भात काम करणार्या संस्थेचे प्रमुख इरफान इंजिनियर यांनी आपल्या भाषणात एनपीएमच्या ३ ० वर्षांच्या कार्याचा गौरव केला आणि उपस्थित लोकांमध्ये असलेल्या ऊर्जेचा उल्लेख करताना सांगितलं की, हेच खया अर्थाने भारताचं प्रतिबिंब आहे. त्यांनी आपले अनुभव शेअर करत सांगितलं की, ते डांगमध्ये आदिवासींसोबत काम करत होते, आणि नर्मदा आंदोलनाच्या सुरुवातीच्या टप्प्यात सहभागी होते. मेधा पाटकर यांनी त्यांना पाठवलेल्या एका पत्राचा उल्लेख करत त्यांनी सांगितलं की, गुजरात सरकारने त्यांना नक्षलवादी घोषित केलं होतं आणि तेव्हा मेधाताईंनी लिहिलं होतं "जेव्हा राज्याने आपल्याला नक्षलवादी ठरवलं आहे, तर आपण एकत्र का नाही यावं ?"

ते पुढे म्हणाले की, स्वातंत्र्य चळवळीत दोन राष्ट्रवाद समोर आले – एक धर्मावर आधारित राष्ट्रवाद आणि दुसरा धर्मनिरपेक्ष राष्ट्रवाद. हिंदू राष्ट्रवादाचा दावा असा आहे की, भारत ५ ० ० ० वर्षांपासून राष्ट्र आहे. पण राष्ट्रवाद ही संकल्पना १ ८ व्या शतकाच्या अखेरीस युरोपमध्ये उदयास आली. त्यामुळे

असा दावा करणं हे खोटं आहे. दुसरी गोष्ट म्हणजे, हा राष्ट्रवाद हिंसाचारावर आधारलेला आहे. हिंदू राष्ट्रवाद्यांनी ब्रिटिश साम्राज्यवादी दृष्टिकोनातून इतिहासाचं वर्गीकरण केलं "हिंदू काळ", "मुस्लिम काळ" वगैरे. त्यांनी असा दावा केला की, मुस्लिम शासकांनी हिंदूंना गुलाम बनवलं आणि आता त्याचा बदला घ्यायचा आहे. या कल्पनेमुळे समाजात हिंसा आणि द्वेष वाढतो. याच धर्तीवर, मोहम्मद अली जिन्ना यांनी मुस्लिम राष्ट्रवादाची कल्पना स्वीकारली आणि दोन्ही राष्ट्रवादामध्ये संघर्ष झाला, ज्यामुळे अखेर फाळणी झाली. मात्र, हिंदू राष्ट्रवाद्यांच्या दृष्टीने १५ ऑगस्ट १९४७ नंतर त्यांना "हिंदू राष्ट्र" मिळालं नाही, हा एक "मलाल" राहिला. त्यामुळे त्यांनी मुसलमान आणि ख्रिश्चन धर्मीयांविरोधात द्वेष पसरवण्याचं काम सुरू ठेवलं. भारतातील दंगली हा हिंदू राष्ट्रवाद्यांच्या प्रोपगंडाचा भाग आहेत. १९४७ नंतर वेगवेगळ्या शहरांमध्ये मोठ्या प्रमाणावर दंगली घडवल्या गेल्या आणि प्रत्येक दंगलीत आधीच्या तुलनेत अधिक लोक मारले गेले. कारण ७२ तासांत जास्तीत जास्त हिंसा घडवून समाजात दहशत पसरवण्याचा त्यांचा हेतू असतो. यामुळे समाजात ध्रुवीकरण होतं आणि लोक धर्माच्या आधारे राष्ट्रवाद स्वीकारायला लागतात.

याच्या उलट भारतीय राष्ट्रवाद हा समता, बंधुता आणि विविधतेच्या स्वीकारावर आधारलेला आहे. भारत एक "बनतंय राष्ट्र" आहे – म्हणजेच वेगवेगळ्या संस्कृती, समुदाय आणि परंपरांचा एकसंध प्रवाह आहे. भारतात विविध भाषिक, धार्मिक आणि सांस्कृतिक समुदाय आहेत आणि ते परस्परांशी संवाद साधून आपली संस्कृती समृद्ध करत आले आहेत. भारतीय राष्ट्रवाद हा लोकशाहीच्या आधारावर उभा आहे आणि लोकशाही टिकवण्यासाठी विविधतेला स्वीकारणं आवश्यक आहे. त्यांनी स्कँडिनेव्हियन देशांचा उल्लेख करत सांगितलं की, तिथे लोकशाही ही सत्तेच्या केंद्रीकरणावर नव्हे, तर नागरी हक्क आणि गरजांवर केंद्रित आहे. याउलट, हिंदू राष्ट्रवाद हा सत्तेचं केंद्रीकरण करून "वन नेशन, वन पीपल, वन इलेक्शन" सारख्या संकल्पनांद्वारे समाजावर एकसंधता लादू पाहतो.

त्यांनी सांगितलं की, आपल्याला अशी लोकशाही हवी आहे, जिथे सर्व संस्कृती, विचारधारा आणि समाजघटक एकत्र येऊन संवाद साधू शकतील आणि देशाची पुढची वाटचाल समानतेच्या तत्त्वावर आधारित असेल. त्यांनी महिलांच्या सहभागावरही भर दिला. आज महिला संघर्षाचा भाग आहेत, पण अजूनही समाज पुरुषप्रधान आणि आक्रमक विचारसरणीचा आहे. यासाठी महिलांना अधिक पुढे यावं लागेल आणि समाजातील भेदभाव दूर करण्यासाठी लढावं लागेल. त्यांनी भाषणाच्या शेवटी स्पष्ट केलं की हा लढा अजून संपलेला नाही. संविधान, लोकशाही आणि हक्क यांचं संरक्षण करणं ही प्रत्येकाची जबाबदारी आहे. म्हणूनच एकजूट राहून संघर्ष सुरू ठेवण्याचं त्यांनी आवाहन केलं.

मनाला आणि हृदयाला कसं बदलायचं? - टी. एम. कृष्णा

उदयोन्मुख नेतृत्वाबद्दल रॅमन मॅगसेसे पुरस्कार विजेते, कर्नाटिक संगीत गायक, पर्यावरण आणि पारलिंगी समुहांच्या हक्कांसाठी सक्रीय कार्यकर्ते **टी. एम. कृष्णा** म्हणाले, माझी मातृभाषा वेगळी आहे, आणि ती बोलणाऱ्यांसाठी काही समस्या नाही. हिंदी शिकायला मला काहीच हरकत नाही, पण जर कोणी सांगितले की शाळेत हिंदी शिकायलाच हवी, तर मी नाही शिकणार. आपण दोन वेगवेगळ्या भाषा बोलतो, पण त्यानंतरही आपण संवाद साधू शकतो. कलाकार असणे म्हणजे फक्त विचार करणं नव्हे, तर भावना अनुभवणं देखील आहे. कलाकार मनाने नाही, तर हृदयाने बोलतो. तो गातो, नाचतो, कविता वाचतो, चित्रपट पाहतो, आणि हे सगळं आपल्या भावनांना स्पर्श करत. जर आपण आपल्या समाजात बदल घडवायचा असेल, तर बदल स्वत:मधून सुरू करायला हवा. माझ्यासाठी सर्वात कठीण प्रश्न आहे – आपल्या मनाला आणि हृदयाला कसं बदलायचं? आपण विचाराने समतेबद्दल बोलतो, पण समोरच्या माणसाला भेटल्यावर आपलं वागणं तसं असतं का? मी स्वत:च लोकांना एका विशिष्ट दृष्टीकोनातून पाहतो, त्यांना लगेच जज करतो. समतेच्या गप्पा मारणं सोपं आहे, पण ती खरंच अनुभवणं कठीण आहे.

आजचं राजकारण हिंसक आहे. हे एक काळे ढगासारखं आहे, ज्याला आपण प्रतिकार केला पाहिजे. पण प्रतिकारासोबतच आपल्याला जोडणाऱ्या गोष्टीही शोधल्या पाहिजेत. आपण आक्रमणाला उत्तर देणं गरजेचं आहे, पण त्याच वेळी आपल्या समाजात खरी एकता आहे का, यावर विचार करणंही तितकंच महत्त्वाचं आहे. विविधतेत एकता – आणि एकतेत विविधता – हे ऐकायला चांगलं वाटतं, पण आपण ते खरंच जगतो का? हा खूप गंभीर प्रश्न आहे. समाजात समानता नसेल, तर आपण विविधता कशी साजरी करणार? जातीव्यवस्था हा मोठा प्रश्न आहे, आणि

काही लोक त्याचा फायदा घेत आहेत. ही असमानता आपण कशी मोडू शकतो?

इथे कलाकार, संगीत, नृत्य, नाटक, कविता यांची भूमिका खूप महत्त्वाची होते. अनेकदा आपण थेट संवाद साधू शकत नाही, पण संगीत, कला, आणि नाटक यांच्याद्वारे आपण जोडले जातो. त्यावेळी आपण विचार करत नाही, तर अनुभवतो, भावनांशी जोडले जातो. कला आणि संस्कृती आपल्याला एकत्र आणू शकतात. पण आज आपण त्याच गोष्टींना आपल्यातून वेगळं केलं जात आहे. संगीत, नृत्य, नाटक यांचं राजकीयीकरण केलं जात आहे. त्यांचा उपयोग फूट पाडण्यासाठी केला जात आहे. शालेय शिक्षणापासूनच आपण विविधतेला कसं स्वीकारायचं, हे शिकवलं पाहिजे. भारत हा एकाच संस्कृतीचा देश नाही, भारत अनेक संस्कृतींचा संगम आहे. विविध भाषांमध्ये, विविध संगीत आणि कलांमध्ये भारतीय संस्कृती अस्तित्वात आहे.

जर आपण खरोखरच संवाद साधू इच्छित असू, तर आपल्याला संगीत, रंग, डिझाईन्स, कथा – या माध्यमांतून जोडायला हवं. कारण शेवटी प्रत्येक माणसाला एकच गोष्ट हवी असते – सुख आणि सुरक्षितता. क्रांती संगीतामध्ये आहे, प्रश्न विचारण्यात आहे. लोकशाहीतील सर्वात महत्त्वाचा शब्द "प्रश्न" आहे. म्हणूनच, आपण प्रश्न विचारले पाहिजेत, आणि एकमेकांचे प्रश्न ऐकले पाहिजेत.

आपण पुढील २० – ३० वर्षांचा विचार केला पाहिजे. सरकारं येतील आणि जातील, पंतप्रधान बदलतील, पण आपल्या समाजात जे विष भरलं जात आहे, ते आपण कसं दूर करणार? हा विषारी विचार फक्त राजकीय नव्हे, तर सांस्कृतिक आणि भावनिक पातळीवरही दूर करावा लागेल. हा बदल एका वर्षात होणार नाही. आपल्याला दीर्घकालीन योजना तयार करावी लागेल – १० – २० वर्षांची योजना – जी समाजातील फूट पाडण्याच्या प्रयत्नांना रोखेल. वास्तविक, आपल्याला एकमेकांशी पूर्णत: सहमत होण्याची गरज नाही. आपण वेगळ्या धर्माचे, वेगळ्या जातीचे, वेगळ्या भाषा बोलणारे असू शकतो. पण तरीही आपल्याला हसता आलं पाहिजे, एकत्र राहता आलं पाहिजे, प्रेम करता आलं पाहिजे.

यातच भारत आहे. भारत म्हणजे मतभेद असूनही एकत्र राहणं, एकमेकांच्या भिन्नतेला स्वीकारणं आणि साजरं करणं. भारत कोणत्याही एका तत्वज्ञानाने बांधलेला नाही, भारत एक भावना आहे – आनंद, प्रेम, सुरक्षितता, आणि एकमेकांबद्दलचा आदर. हा बदल कोणत्याही राजकीय अजेंड्याने होणार नाही. हा बदल हृदयाचा आहे. हा बदल मनाचा आहे. हा बदल समाजाचा आहे. आणि म्हणूनच, हा बदल आवश्यक आहे.

केवळ निवडणूक म्हणजे लोकशाही नव्हे, खरी लोकशाही लोकांच्या सहभागात - ॲड्. प्रशांत भूषण

सर्वोच्च न्यायालयातील जनहिताचे खटले चालवण्यासाठी सुप्रसिद्ध असलेले वकील, लेखक ॲड्. **प्रशांत भूषण** म्हणाले, इथे ही जी सभा झाली आहे, ती दाखवते की हिंदुस्तानात किती विविधता आहे – भाषा, धर्म, संस्कृती, खाद्यसंस्कृती, पेहराव, सगळ्या प्रकारची विविधता! आणि ही आमच्या देशाची एक मोठी ताकद आहे. आज एक अतिशय महत्त्वाचा मुद्दा समोर आहे. जर आपण बघितले की आपल्या देशाचे मुख्य मूल्य काय आहेत, जे आपण स्वीकारतो आणि जे आज होत आहे ते नाकारतो, तर त्यात सेक्युलरिझम (धर्मनिरपेक्षता) आणि विविधता हे अत्यंत महत्त्वाचे मुद्दे आहेत.

पण त्याशिवाय अनेक महत्त्वाचे मुद्दे आहेत. आपले संविधान आपल्याला अनेक मूलभूत हक्क देतो – समानतेचा हक्क, स्वातंत्र्याचा हक्क, नागरी हक्क. नागरी हक्कांमध्ये अभिव्यक्ती स्वातंत्र्य, संघटन स्वातंत्र्य, मुक्त संचाराचा हक्क आणि आंदोलन करण्याचा हक्क हे सर्व अंतर्भूत आहेत. आणि हे सर्व आपल्या संविधानाने स्वीकारले, पण आज त्यांच्यावर हल्ले होत आहेत. ॐ ाज आपण बघतो आहोत की आपल्या स्वातंत्र्यावर हल्ले होत आहेत. जर कोणी सरकारविरुद्ध बोलले, विशेषत: जर कोणी मुस्लिमांचा बचाव केला, तर त्यांना अटक केली जाते, तुरुंगात टाकले जाते, त्यांच्यावर यूएपीएसारखे कायदे लादले जातात. समानतेचा विचार केला, तर देशात मोठ्या प्रमाणावर प्रयत्न सुरू आहेत की मुस्लिमांना दुय्यम नागरिक बनवले जावे. स्वातंत्र्य आणि समानतेवर घाला घालण्याचा सर्वात मोठा प्रयत्न अभिव्यक्ती स्वातंत्र्यावर होत आहे. असे दिसते की जो कोणी सरकारविरुद्ध बोलतो, त्याच्यावर वेगवेगळ्या पद्धतीने हल्ले होतात. एकतर रस्त्यावर थेट हिंसाचार होतो किंवा सोशल मीडियावर ट्रोलिंगच्या माध्यमातून लोकांना धमक्या दिल्या जातात, मारण्याची किंवा बलात्कार करण्याची धमकी दिली जाते. हे समाजात वेगळ्या प्रकारचे हिंसक वातावरण निर्माण करते. त्याशिवाय काहींना सरळ अटक केली जाते.

सरकार वेगवेगळ्या प्रकारे सेंसरशिप लादत आहे. सरकार सोशल मीडिया कंपन्यांना सांगते की काही पोस्ट हटवा. उदाहरणार्थ, जर कोणी दिल्लीतील रेल्वे अपघाताबद्दल लिहिले, तर ती पोस्ट काढून टाकली जाते. अशा प्रकारे सरकार विचारांचे नियंत्रण करत आहे. कधी कधी आमच्या सारखे लोकही प्रोपगंडावर विश्वास ठेवतात. कोविडच्या वेळी आम्ही बघितले की लिबरल आणि डाव्या विचारांचे लोकसुद्धा असे म्हणू लागले होते की काही लोक जे चुकीची माहिती पसरवत आहेत, त्यांना रोखले पाहिजे, त्यांची विधाने हटवली पाहिजेत. पण हे चुकीचे होते. कोणती गोष्ट खरी आणि कोणती खोटी हे ठरवणे सोपे नसते. अनेकदा आपल्याला वाटते की आपले मतच योग्य आहे आणि दुसऱ्यांचे मत चुकीचे आहे. पण वेळ गेल्यावर कळते की सत्य काही वेगळे असते. कोविडच्या बाबतीत असेच झाले. अनेकांना वाटले की लस खूप प्रभावी आहे, मास्क आवश्यक आहे, लॉकडाऊन अनिवार्य आहे. पण नंतर समजले की यापैकी अनेक गोष्टी चुकीच्या होत्या. लसीमुळे हानी झाली, मास्कचा फायदा कमी आणि तोटाच जास्त, लॉकडाऊनमुळेही देशाचे मोठे नुकसान झाले. त्यामुळेच आपल्याला क्रिटिकल थिंकिंग आणि वैज्ञानिक दृष्टिकोनाची आवश्यकता आहे.

संविधानात लिहिले आहे की प्रत्येकाने वैज्ञानिक दृष्टिकोन ठेवला पाहिजे. पण आज परिस्थिती अशी आहे की सरकारविरुद्ध कोणीही बोलले की त्यांना देशद्रोही ठरवले जाते. देशभरातील विद्यापीठांमध्ये आरएसएसच्या लोकांना कुलगुरू बनवले जात आहे, जे विद्यार्थी आणि शिक्षक यांना स्वतंत्र विचार करण्यापासून रोखत आहेत. काही लोक म्हणतात की विद्यापीठात टँक आणि लढाऊ विमाने आणावीत, जेणेकरून लोक भीतीने गप्प बसतील. विद्यार्थ्यांना प्रश्न विचारण्याची संधीच दिली जात नाही.

लोकशाही हा आणखी एक महत्त्वाचा मुद्दा आहे. आपण म्हणतो की आपला देश लोकशाही आहे, पण लोकशाही दोन प्रकारची असते – केवळ निवडणूक म्हणजे लोकशाही नव्हे, खरी लोकशाही लोकांच्या सहभागाने चालते. सत्ता केवळ केंद्रात असता कामा नये, सत्तेचे विकेंद्रीकरण झाले पाहिजे. प्रत्येक गाव आणि मोहल्ल्याच्या प्रश्नांवर स्थानिक लोकांनीच निर्णय घ्यावेत. मोठ्या निर्णयांसाठी मोठ्या स्तरावर निर्णय घेतले जावेत, पण केंद्राकडे फक्त राष्ट्रीय पातळीवरील विषय असावेत. पण आज उलट चालले आहे – सत्ता अधिकाधिक केंद्रीत केली जात आहे.

किमान आपण एवढे तरी करायला हवे की कोणताही कायदा करण्याआधी त्याचा मसुदा (ड्राफ्ट) सार्वजनिक केला पाहिजे. जनता त्यावर चर्चा करू शकली पाहिजे, तज्ज्ञांनी त्यावर मत द्यायला हवे. पण आज आपण पाहतो आहोत की पार्लमेंटमध्ये एकाच दिवशी १०–२० कायदे पारित केले जातात, कोणत्याही चर्चेशिवाय, कोणत्याही संसदीय स्थायी समितीकडे न पाठवता! संविधानाने लोकशाही वाचवण्यासाठी स्वतंत्र संस्था निर्माण केल्या – न्यायपालिका, निवडणूक आयोग, कॅग, पोलिस तपास संस्था.

पण आज या सर्व संस्था सरकारच्या नियंत्रणाखाली आणल्या जात आहेत. न्यायपालिका सरकारच्या दबावाखाली काम करत आहे. याचे मुख्य कारण म्हणजे निवृत्तीनंतर न्यायाधीशांना सरकारी पदे देऊन त्यांचे निर्णय प्रभावित केले जात आहेत. कोणी न्यायाधीश सरकारविरोधात निर्णय दिला, तर तो नंतर कोणत्याही पदावर नेमला जात नाही, पण जो सरकारच्या बाजूने निर्णय देतो, त्याला राज्यसभेचे सदस्य, राज्यपाल किंवा मानवाधिकार आयोगाचा अध्यक्ष केले जाते.

त्याशिवाय या सरकारने न्यायपालिका नियंत्रित करण्यासाठी नवा मार्ग शोधला आहे – स्वतंत्र विचारांच्या न्यायाधीशांची नेमणूकच टाळणे. सर्वोच्च न्यायालयाचे कॉलेजियम काही न्यायाधीशांची नावे सुचवते, पण सरकार ती मंजूर करत नाही, त्यावर बसून राहते. शेवटी कॉलेजियमला दबाव टाकून सरकारला हवे असलेले लोक न्यायपालिका प्रणालीत घ्यावे लागतात.

निवडणूक आयोग आणि इतर स्वायत्त संस्थांचाही हा हाच प्रकार केला जात आहे. निवडणूक आयुक्त आणि महालेखापाल यांची निवड सरकारच्या ताब्यात ठेवली जात आहे, त्यामुळे हे लोक निष्पक्ष राहू शकत नाहीत. खरा भारत हा दबलेल्या, वंचित लोकांच्या संस्कृतीत - **डी. यू. सरस्वती**

कन्नड दलित स्त्रीवादी कार्यकर्ती, लेखक, थिएटर आर्टिस्ट **डी. यू. सरस्वती** म्हणाल्या, आज आपण एकत्र आलो आहोत, याचा मला खूप आनंद आहे. पण आपल्याला स्वत:ला विचारायचं आहे की, आपण आपल्या दैनंदिन जीवनात आणि व्यवसायात कोणते बदल करू शकतो? आपण आपल्या विविधतेसह एकत्र येऊ शकतो का? आपल्या राजकारणातून पर्यायी विचारसरणी शोधता येईल का? आपल्याला ज्ञान, कौशल्य

आणि संघर्षाने मिळवलेली शिकवण आत्मसात करायला हवी. जे लोक वर्चस्ववादी सांस्कृतिक आणि राजकीय प्रवाहांना आव्हान देत आले आहेत, त्यांच्याकडून शिकायला हवं. हाच खरा भारतीय सांस्कृतिक वारसा आहे. हा रेषात्मक नाही, तर चक्रीय आहे.

आपल्याला लोकशाहीसाठी नवीन सांस्कृतिक जागा निर्माण करायला हव्यात. सत्य, समता आणि न्याय यांना आपल्या दैनंदिन जीवनात जागा मिळाली पाहिजे. आपल्याला संविधानावर निष्ठा ठेवण्र्या सर्व लोकांसोबत उभं राहायला हवं, कारण भारतीय लोकशाही हीच आपली खरी आस्था आहे. माझा धर्म हा भारतीय संविधान आहे आणि हे संविधानच माझं पवित्र ग्रंथ आहे.

आज मणिपूरमध्ये जे घडत आहे, ते जातीय ध्रुवीकरण आणि खोट्या प्रचाराचं परिणाम आहे. आपण अशा खोट्या प्रचारावर विश्वास ठेवणं थांबवायला हवं आणि सत्याचा मार्ग स्वीकारला पाहिजे. प्रेमाची आणि एकतेची राजकीय चळवळ उभारायला हवी. आपल्या रोजच्या व्यवसायात आणि जीवनात समतेच्या विचारांची अंमलबजावणी झाली पाहिजे.

मी गेली तीन दशके सफाई कामगारांसोबत काम करत आहे. या समाजावर झालेला अन्याय हा केवळ राज्याकडूनच नाही, तर संपूर्ण समाजाकडूनही झाला आहे. त्यांचे अस्तित्वच पुसून टाकण्याचा प्रयत्न केला जातो आहे. त्यांना फक्त गटारं साफ करायची असतात, पण त्यांच्या अस्तित्वालाच मान्यता मिळत नाही. लोकांना हे माहितीही नसतं की, ते कोण आहेत आणि त्यांचं जीवन कसं असतं. मी अरुणा रॉय यांचं एक पुस्तक वाचत होते, आणि त्यातून मला जाणवलं की, सर्वात तळागाळात असणाऱ्या या लोकांसोबत राहून मला खया अर्थाने समतेची आणि प्रेमाची राजकीय शिकवण मिळाली.

आपण अन्न ग्रहण करताना त्याला प्रसाद मानतो, तो पूजनीय असतो. पण तोच अन्न जर मलमूत्रात बदलला, तर आपण त्याकडे घृणास्पद नजरेने पाहतो. पण आपण लक्षात घेत नाही की, तीच माती आणि तीच खत पिकांना पोषण देते. सफाई कामगार हे आपल्या समाजाचं ते घटक आहेत, जे हे सगळं हाताळतात, पण आपण त्यांना नाकारतो.

सफाई कामगारांना मॅनहोलमध्ये मारलं जात आहे, अत्यंत अस्वच्छ परिस्थितीत काम करावं लागत आहे, पण कोणीही यावर बोलत नाही. सरकार म्हणतं की, आता कुठेही हाताने मैला उचलला जात नाही, पण सत्य वेगळंच आहे. लोकांना सांगितलं जातं की, 9मॅन्युअल स्कॅव्हेंजिंग9 हा शब्द आता इतिहासजमा झाला आहे, पण सत्य असं आहे की, अजूनही हजारो लोक हीच कामं करत आहेत.

खरा भारत हा दबलेल्या, वंचित लोकांच्या संस्कृतीत आहे. त्यांचं अस्तित्वच नाकारलं जातं, त्यांना कोणी पाहतही नाही. पण एक कार्यकर्ते म्हणून आपल्याला आपल्या मार्गावर विचार करायला हवा. जे वंचित आहेत, जे अदृश्य आहेत, त्यांच्याकडे आपण पुन्हा एकदा पाहायला हवं. त्यांच्या संस्कृतीत, त्यांच्या संघर्षात खया भारतीय संस्कृतीचा आत्मा आहे. आपण या संघर्षासाठी एकत्र यायला हवं, आपल्या संविधानावर विश्वास ठेवायला हवा आणि लोकशाहीसाठी आपला लढा सुरू ठेवायला हवा.

संस्कृतिक क्रांतीशिवाय व करुणेशिवाय कोणतंही सामाजिक आंदोलन अपूर्ण - **अरुणा रॉय**

सुप्रसिद्ध महितीचा अधिकार चळवळीच्या कार्यकर्त्या, माजी आयएएस अधिकारी **अरुणा रॉय** यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणात सर्व वक्त्यांनी मांडलेल्या मुद्द्यांचा परामर्श घेतला. त्या म्हणाल्या, आजही आपल्या देशात सफाई कर्मचारी आंदोलनात सहभागी असोत किंवा नसोत, समाज त्यांच्याशी कसा वागतो? आपण त्यांना दुर्लक्षित करतो, त्यांची ओळख मानत नाही, त्यांचे अस्तित्व नाकारतो. हा भेदभाव आजही समाजात आहे. जर असं असेल, तर समाजाची खरी व्याख्या काय असू शकते? लोकशाहीचा अर्थ काय आहे? मला वाटतं की, या विषयावर आपण नक्कीच एक ठराव घ्यायला हवा, कारण हा अत्यंत महत्त्वाचा मुद्दा आहे. आपण जिथे काम करतो, तिथे हा विषय आपल्या पहिल्या प्राधान्यक्रमात असायला हवा.

महिलाच मैला वाहून नेतात, ते आपल्या डोक्यावर घेऊन जातात, पण कोणी त्यांच्यासाठी काहीही बोलू इच्छित नाही. फक्त बोलणंच नाही, तर त्यांच्या आयुष्याबद्दल विचारही करायचा नाही. त्यांच्या अस्तित्वालाच मान्यता द्यायची नाही. आपण अशा समाजात जगत आहोत. मला हे खूप खोलवर जाऊन भिडलं आहे. तुम्हाला हे कितपत भावलं, हे मला माहित नाही, पण जर हा मुद्दा तुम्हाला महत्त्वाचा वाटत असेल, तर कृपया या विषयावर हात उचलून, टाळ्या वाजवून किंवा इतर

(पान ३१ वर)

खास वृत्तांत

NAPM हैदराबाद राष्ट्रीय संमेलन : गट चर्चांचे संक्षिप्त अहवाल

गट चर्चा १- पारदर्शकता व उत्तरदायित्व यंत्रणा आणि कायदे

NAPM च्या राष्ट्रीय अधिवेशनात पारदर्शकता, उत्तरदायित्व व संस्थात्मक देखरेख यंत्रणा यावरील समांतर सत्रात नागरिक अधिकार, माहितीचा अधिकार, न्यायव्यवस्था, पोलीस यंत्रणा व निवडणूक प्रक्रिया यावर सखोल चर्चा झाली. देशात गेल्या दशकात पारदर्शकता व जबाबदारी सुनिश्चित करणाऱ्या कायद्यांवर व संस्थांवर सातत्याने हल्ले झाले आहेत, ही मुख्य चिंता सत्रात व्यक्त झाली.

सत्रात सर्व सहभागींनी नागरिकांना सक्षम करणाऱ्या कायद्यांचा ऱ्हास, माहितीचा अधिकार कमजोर होणे, व माहिती आयोगांची निष्क्रियता, न्यायपालिका व निवडणूक यंत्रणेतील विश्वासहानी अशा अनेक मुद्द्यांवर चर्चा केली. चर्चा व विश्लेषणानंतर खालील ठराव व मागण्या सर्वसंमतीने पारित करण्यात आल्या:

१. माहितीचा अधिकार (RTI) कायद्यातील प्रतिगामी सुधारणा रद्द करा:

RTI कायद्यात 2019 व 2023 मध्ये झालेल्या सुधारणांनी कायद्याचे स्वरूप व शक्ती दोन्ही गंभीरपणे कमकुवत केले आहे.

❑ 2019 च्या सुधारणांनी माहिती आयोगांची स्वायत्तता घालवली.

❑ 2023 मध्ये ‘Digital Personal Data Protection Act' द्वारे RTI कायद्यातील कलम 8(1)(j) मध्ये बदल करून ‘वैयक्तिक माहिती’ संपूर्णत: माहिती अधिकाराच्या कक्षेबाहेर नेण्यात आली आहे. पूर्वी जिथे सार्वजनिक हितासाठी काही माहिती मिळवता येत होती, ती संधीही आता संपली आहे.

मागणी: RTI कायद्यातील 2019 आणि 2023 मधील सर्व प्रतिगामी सुधारणांचा त्वरित रद्दबातल करावा.

२. सक्रीय माहिती जाहीर करण्याचे बंधन पाळा:

RTI कायद्याअंतर्गत आणि सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशांनुसार सरकार आणि सार्वजनिक संस्थांनी नियमितपणे व स्थानिक भाषेत माहिती जाहीर करणे बंधनकारक आहे.

❑ पोलिसांकडून FIR माहिती द्यावी असे निर्देश असतानाही, अनेक वेळा FIR ‘संवेदनशील‘ ठरवून माहिती लपवली जाते.

मागणी: सर्व माहिती सक्रीयपणे, स्थानिक भाषेत, ऑनलाइन व ऑफलाइन पद्धतीने लोकांसमोर ठेवावी.

३. व्हिसलब्लोअर्स संरक्षण कायदा लागू करा:

2014 मध्ये संमत झालेला Whistleblowers Protection Act आजतागायत लागू करण्यात आलेला नाही.

❑ गेल्या १० वर्षांत शेकडो लोक भ्रष्टाचार आणि अन्याय उघड करताना मारले गेले आहेत.

मागणी: हा कायदा त्वरित अमलात आणावा आणि 2011 मधील 9Grievance Redress Bill’ च्या धर्तीवर तक्रार निवारणासाठी स्वतंत्र, विकेंद्रीकृत आणि कालबद्ध व्यवस्था तयार करावी.

४. माहिती आयोगांची रिक्त पदे त्वरित भरा:

❑ देशभरात अनेक माहिती आयुक्त पदे रिक्त आहेत. काही राज्यांत तर आयोग पूर्णत: निष्क्रिय आहेत.

❑ त्यामुळे हजारो अपील व तक्रारी प्रलंबित असून, नागरिकांचा मूलभूत माहिती अधिकार नाकारला जात आहे.

मागणी: सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशांप्रमाणे पारदर्शक पद्धतीने सर्व रिक्त पदे त्वरित भरावीत.

५. जनजागृती मोहीमा व आंदोलन:

NAPM आणि त्याच्या घटक संघटना देशभरात RTI कायदा, त्यावरील हल्ले व नागरिक हक्क याबाबत जनजागृती मोहिमा राबवतील.

उद्दिष्ट: सजग नागरिक, समुदाय व संघटनांचे जाळे उभे करून उत्तरदायित्वासाठी व्यापक जनचळवळ घडवून आणणे.

६. न्यायव्यवस्थेतील उत्तरदायित्व व पारदर्शकता:

❑ न्यायाधीशांची निवड पारदर्शक व विवेकपूर्ण पद्धतीने व्हावी.

❑ सर्व स्तरांवरील न्यायाधीशांच्या नियुक्तीसाठी व तक्रारींच्या चौकशीसाठी स्वतंत्र न्यायिक नियुक्ती व तक्रार आयोग स्थापन करावा.

❑ न्यायालयीन प्रशासनाशी संबंधित सर्व माहिती जसे की खटले वाटप, न्यायाधीशांचे रोस्टर, अर्जांचे उल्लेख आदी सार्वजनिक केली जावी.

७. संघर्षग्रस्त भागांतील जबाबदारी:

❑ पोलिस यंत्रणा ही निमलष्करी दलांपासून स्वतंत्र ठेवली जावी, जेणेकरून नागरिक सहज संपर्क साधू शकतील.

❑ दलित आयोग, महिला आयोग, मानवाधिकार आयोग इ.च्या प्रतिनिधी असलेल्या स्वतंत्र मंचामार्फत नागरिकांच्या तक्रारींचे निवारण व्हावे.

❑ राज्याच्या ताब्यात घेतलेल्या सर्व व्यक्तींची माहिती तत्काळ सार्वजनिक केली जावी, ऑनलाईन व स्थानिक माध्यमांतून.

८. निवडणूक आयोगातील अपारदर्शकतेवर उपाय:

❑ नवीन कायद्यानुसार निवडणूक आयुक्तांची निवड करणाऱ्या समितीत सरन्यायाधीशाऐवजी कॅबिनेट मंत्री नेमण्यात आला आहे. हे बदल लोकशाही विरोधी आहेत.

❑ 2024 मधील Conduct of Election Rules सुधारणा मुळे मतदार यादी, फॉर्म 17C (मतमोजणी तपशील) यांसारखी महत्त्वाची माहिती मिळणे कठीण झाले आहे.

मागणी:

❑ निवडणूक आयुक्तांची निवड पंतप्रधान, विरोधी पक्षनेते व सरन्यायाधीश यांच्या समितीमार्फतच व्हावी.

❑ Conduct of Election Rules मधील प्रतिगामी सुधारणा मागे घेतल्या जाव्यात.

❑ सर्व निवडणूक संबंधित माहिती सार्वजनिक केली जावी.

NAPM ने Citizens' Commission on Elections ने मांडलेल्या सगळ्या शिफारशींना समर्थन दिले.

दुसरा दिवस २ मार्च २०२५

गट चर्चा २ - वंचित घटकांच्या संघर्षांशी एकात्मता व्यक्त करणं (दलित, आदिवासी, धार्मिक, जातीय, लैंगिक, अपंग व इतर अल्पसंख्याक)

समन्वयक: प्रिया दर्शिनी, प्रसाद चाको, प्रवीर पीटर

या सत्रात उत्तर प्रदेश, छत्तीसगड, पश्चिम बंगाल, झारखंड, आंध्र प्रदेश, तेलंगणा, गुजरात, राजस्थान, मध्य प्रदेश, बिहार, कर्नाटका आणि ओडिशा या राज्यांमधून आलेले प्रतिनिधी सहभागी झाले होते. देशभरातील विविध वंचित समुदायांच्या अनुभवांवर, संघर्षांवर, आणि त्यांच्यातील ऐक्य घडवण्याच्या गरजांवर आधारित सखोल चर्चा या सत्रात झाली. पुढीलप्रमाणे ठळक मुद्दे आणि त्यांच्यावरचा विस्तृत विचार मांडण्यात आला:

१. आदिवासी समाजात धर्माच्या आधारावर फूट पाडण्याचा प्रयत्न:

देशात विविध ठिकाणी विशेषत: आसामपासून छत्तीसगडपर्यंत आरएसएसकडून चालवली जाणारी 'जनजाती सुरक्षा मंच' ही मोहीम आदिवासी समाजात हिंदू आणि ख्रिस्ती अशा धार्मिक आधारावर फूट पाडण्याचे काम करत आहे. ही फूट आदिवासींच्या ऐक्याला धक्का पोचवते. त्यामुळे सर्व संघर्षशील घटकांनी एकत्र येऊन याला विरोध करणं गरजेचं आहे. याशिवाय, आदिवासी समुदाय Census मध्ये स्वतंत्र ओळख म्हणून नोंदवला जावा, ही मागणी सत्रात एकमुखीपणे मान्य झाली.

२. वंचित चळवळींमध्ये परस्परसंवादाचा अभाव:

सत्रात नमूद करण्यात आलं की, आदिवासी, मुस्लिम, महिला, दलित आणि इतर वंचित घटक आपापल्या संघर्षांमध्ये गढलेले असून त्यांच्यात फारसा समन्वय आढळत नाही. या चळवळी स्वतंत्रपणे चालत असल्यामुळे त्यांची एकत्र ताकद कमी होते. सर्व वंचित समुदायांनी एकत्र येऊन परस्पर ऐक्य वाढवण्याची आणि एकमेकांच्या संघर्षाशी जोडून घेण्याची गरज आहे.

३. झारखंडमधील मुस्लिम आणि आदिवासी समाजावरचा हिंसाचार आणि त्याविरोधातील ऐक्यबद्ध लढा:

झारखंडमधील प्रतिनिधींनी सांगितलं की, तिथे मुस्लिम आणि आदिवासी समाजावर मॉब लिंचिंगच्या घटनांचा अनुभव घेतला गेला. नागरिकत्व कायद्यातील दुरुस्तीच्या विरोधात हे समुदाय एकत्र आले. निवडणुकांच्या काळात मुस्लिमांना 'परकीय घुसखोर' म्हणत टार्गेट केलं गेलं, पण झारखंडमधील सामाजिक गटांनी एकत्र येऊन अशा द्वेषपूर्ण राजकारणाला विरोध केला.

४. महाराष्ट्रातील आदिवासी समाजात तरुण मुलींच्या देवाणघेवाणीविरोधातील संघर्ष :

महाराष्ट्रातील प्रतिनिधींनी आदिवासी समाजात आजही काही भागांत तरुण मुलींच्या जबरदस्तीने देवाणघेवाण केली जात असल्याचे सांगितले. या अमानवी प्रथेविरोधात स्थानिक पातळीवर संघर्ष सुरू आहे. काही ठिकाणी दलित व आदिवासी समाजातही अंतर्गत जातीभेद दिसतो, याविरोधातही जागरूकतेची गरज आहे.

५. आंध्र प्रदेशातील जातीभेदावरचा प्रतिकार :

आंध्र प्रदेशातील कार्यकर्त्यांनी सांगितलं की, त्यांच्या गावांमध्ये आजही जातीबाह्य विवाह करणाऱ्यांवर बहिष्कार टाकला जातो. दोन कपांची प्रथा सर्रास आहे. या सगळ्या जातीभेदांविरोधात स्थानिक पातळीवर एकत्र येऊन प्रतिकार केला जात आहे.

६. मध्य प्रदेश बुलडोझर राज आणि CAA विरोधातील लढा :

मध्य प्रदेशातील बडवानी येथे मुस्लीम, दलित आणि आदिवासी समाजाने बुलडोझर राज आणि नागरिकत्व कायद्यातील बदलांवर एकत्र येऊन सामूहिक लढा दिला.

७. ओडिशातील आदिवासींच्या जमिनीवरचा अधिकार नाकारला जातो :

ओडिशातील प्रतिनिधींनी सांगितलं की, "आम्ही या जमिनीचे मूळ मालक आहोत, पण सरकार दलालासारखं वागतं आणि कंपन्यांना आमच्या जमिनी हस्तांतरित करतं." आदिवासींची जमीन हिसकावली जाते, ते विस्थापित होतात ही एक प्रमुख समस्या आहे.

८. मुस्लिम समुदायावर चालवला जाणारा सामाजिक आणि आर्थिक बहिष्कार :

NRC, CAA, लव्ह जिहाद अशा मुद्द्यांच्या नावाखाली मुस्लिम समाजाला लक्ष्य केलं जातं आहे. उत्तर प्रदेशमध्ये दुकानांवर मुस्लिम नावं लिहून त्यांच्यावर आर्थिक बहिष्कार घालण्याचा आदेश देण्यात आला होता, जो नंतर न्यायालयाने रद्द केला. त्यांचे घर पाडणे, रोजगारापासून वंचित ठेवणे या गोष्टी सामाजिक भेदभावाची उदाहरणं आहेत.

९. दारूचा वापर आदिवासी समाजाला दुर्बल करण्याचे माध्यम :

अनेक भागांत दारूचा जाणीवपूर्वक वापर करून आदिवासी समाजामध्ये व्यसन वाढवलं जातं, ज्यामुळे त्यांची संघटित ताकद कमी होते. ही प्रक्रिया सरकार, दलाल आणि शक्तिशाली संस्थांनी चालवलेली असल्याचे निरीक्षण मांडले गेले.

१०. सांस्कृतिक गोंधळ आणि हिंदुत्वाचा प्रभाव :

RSS च्या अजेंड्यानुसार चतुर्वर्ण व्यवस्थेचं पुनरुज्जीवन, पाठ्यपुस्तकांमधून हिंदुत्वाचा प्रचार, आदिवासी देवतांना हिंदू देवतांशी जोडणं या सगळ्या गोष्टी सुरू आहेत. सरना/आदि धर्म यांना "सनातन धर्म" म्हणून समाविष्ट करण्याचा प्रयत्नही चालू आहे. दलित समाजालाही हिंदुत्वाच्या प्रभावाखाली आणण्याचे प्रयत्न सुरू आहेत.

११. जाती निर्मूलन हाच सर्व संघर्षांचा केंद्रबिंदू :

सत्रात स्पष्ट सांगण्यात आलं की, जातीव्यवस्था नष्ट करणं ही सर्वात महत्त्वाची गरज आहे. संविधानिक अधिकार, शिक्षण, आरोग्य, नागरी सुविधा यासाठी सर्व समुदायांनी एकत्र येऊन काम करणं आवश्यक आहे.

१२. मच्छीमार व किनारी समुदायांचे प्रश्न :

वनजा यांनी व्यासपीठावरून सांगितले की मच्छीमार व किनारी समाज देखील वंचित आहेत आणि त्यांच्या प्रश्नांकडेही लक्ष देणं आवश्यक आहे. त्यांचा संघर्षही समांतरपणे घेऊन जाणं गरजेचं आहे.

NAPM साठी पुढील दिशा

NAPM आणि इतर राष्ट्रीय, प्रादेशिक मंचांनी वंचित समुदायांमध्ये नेतृत्व उभं करणं, अनुभवांची देवाणघेवाण (cross learning), आणि परस्पर सहकार्य वाढवणं हे पुढचं पाऊल असायला हवं. ज्यांचा आवाज ऐकला जात नाही, जे अजूनही मूग गिळून गप्प आहेत त्यांच्यापर्यंत पोहोचणं आणि त्यांना सक्षम करणं ही चळवळींची जबाबदारी आहे. भाषा, प्रदेश, धर्म, लिंग या सर्व भेदांपलीकडे जाऊन संघर्षशील समुदायांना एकत्र आणणं हाच खरा लोकशाहीचा मार्ग आहे.

गट चर्चा ३ - साम्प्रदायिक द्वेष आणि सामाजिक सलोखा टिकवण्यासाठीचे प्रयत्न

या सत्रात सहभागी प्रतिनिधींनी सध्याच्या राजकीय परिस्थितीवर गंभीरपणे प्रकाश टाकत, धर्मनिरपेक्षतेच्या तत्त्वांना धोका पोहोचवणाऱ्या प्रवृत्तींचा पर्दाफाश केला. त्यांनी याला केवळ "हिंदुत्वाचा उदय" न म्हणता, संविधानाच्या विरोधात चाललेली एक व्यापक आणि योजनाबद्ध मोहीम असे म्हटले.

भारत एक हिंदू राष्ट्र बनवण्याचा राजकीय अजेंडा:
सत्राच्या प्रारंभिक चर्चेत सांगितले गेले की, भारताला हिंदू राष्ट्र बनवण्याच्या दिशेने जी घातक घसरण झाली आहे, ती आता अधिक स्पष्टपणे समोर येत आहे.

- ❑ नागरिकत्व सुधारणा कायदा (CAA),
- ❑ धर्मांतर विरोधी कायदे,
- ❑ बहुसंख्याक समाजाच्या बाजूने दिलेले न्यायालयीन निर्णय,
- ❑ आणि विधानसभांमध्ये व संसदेत धार्मिक भाषणांचा सुळसुळाट

या सर्व गोष्टी भारतातील धर्मनिरपेक्ष राज्यघटना आणि सर्वसमावेशक राष्ट्रवाद यांच्या विरोधात जात आहेत.

या प्रवृत्तीमुळे मुस्लिम, ख्रिस्ती आणि इतर धार्मिक अल्पसंख्याक समुदाय भयभीत झाले असून, त्यांना दुय्यम वांशिक दर्जा देण्याचे प्रयत्न सुरु आहेत.

हिंदुत्वाची राजकीय संकल्पना आणि हिंदू धर्माचे अपहरण:

चर्चेदरम्यान स्पष्ट करण्यात आले की हिंदुत्व ही धार्मिक संकल्पना नसून एक राजकीय विचारधारा आहे. आरएसएस व इतर उजव्या संघटनांनी जी हिंदुत्वाची कल्पना मांडली आहे, ती पुरोगामी, समावेशक, विचारशील हिंदू धर्माच्या विरुद्ध आहे. हिंदू धर्माच्या नावाने आदिवासींच्या सर्ना धर्म वा अन्य स्वदेशी परंपरांनाही "सनातन"च्या चौकटीत बसवण्याचा प्रयत्न केला जात आहे. यामुळे विविध धार्मिक–आध्यात्मिक परंपरांचे समूळ उच्चाटन होण्याचा धोका निर्माण झाला आहे.

सांस्कृतिक संमिश्रतेचे रक्षण प्रेमचंद व टागोर यांचा संदर्भ:

सत्रात सांस्कृतिक सहअस्तित्वाच्या संदर्भात मुंशी प्रेमचंद यांच्या ईदगाह आणि रवींद्रनाथ टागोर यांच्या काबुलीवाला या कथा विशेषत: चर्चेत आल्या.

या साहित्यकृती केवळ कथा नाहीत, तर त्या भारतीय समाजाच्या समन्वयवादी व मानवी मूल्यांच्या रचना आहेत. या कथांमधून धार्मिक भेदांपलीकडे माणुसकीचा संदेश दिला गेला आहे जो आजच्या काळात अधिकच महत्त्वाचा झाला आहे.

आदिवासी भागांतील साम्प्रदायिक ध्रुवीकरण:

एक महत्त्वाचा मुद्दा म्हणजे आदिवासी भागांतील नव्या स्वरूपातील साम्प्रदायिकतेचा प्रसार.

- ❑ "ST डिलिस्टिंग" म्हणजे ख्रिस्ती धर्म स्वीकारलेल्या आदिवासींना अनुसूचित जमातीच्या यादीतून वगळण्याचा प्रस्ताव,
- ❑ आणि आदिवासी विरुद्ध आदिवासी असा संघर्ष निर्माण करण्याचे षडयंत्र या प्रवृत्तींमुळे आदिवासी समाजाचे तुकडे होण्याचा धोका आहे.

सत्रात सांगण्यात आले की, अशा विषारी राजकारणाला धर्माच्या आडून समर्थन दिले जात आहे. याविरोधात आदिवासी नेत्यांनी, चळवळींनी आणि जनतेने एकत्र येऊन वैचारिक आणि राजकीय प्रतिकार उभा करणे आवश्यक आहे.

द्वेषपूर्ण भाषणांविरुद्ध कायदेशीर कारवाई व जनजागृती:

साम्प्रदायिक द्वेष निर्माण करणाऱ्या हेट स्पीचचा प्रचंड प्रसार होत आहे. सोशल मिडिया, सभा, निवडणुकीतील प्रचार यांतून उघडपणे धार्मिक द्वेष पसरवला जातो.
सत्रात स्पष्ट सांगितले गेले की,

❑ प्रत्येक हेट स्पीचची नियमितपणे नोंद व कायदेशीर तक्रार दाखल केली पाहिजे.

❑ यामुळे समाजात जागरूकता वाढेल आणि कायद्याचा वापर करून अशा प्रवृत्तींना थोपवता येईल.

राजकीय प्रतिकाराची गरज पुढील निवडणुकांसाठी रणनीती:

राजकीय पातळीवर या हिंदुत्ववादी शक्तींना रोखणे हे अत्यावश्यक आहे. केवळ सामाजिक नव्हे, तर राजकीय पराभव हा या शक्तींना मागे हटवण्याचा एकमेव ठोस मार्ग आहे. परंतु, सत्रात याचाही इशारा देण्यात आला की,

“राजकीय पराभव झाला तरी, त्यांनी समाजात केलेल्या मानसिक आणि सामाजिक जखमा भरून काढायला अनेक दशके लागतील.‘‘

म्हणून प्रतिकार केवळ निवडणुकीपुरता न ठेवता, तो दररोजच्या कृती, संवाद आणि संघटनात्मक पातळीवर पुढे नेणं गरजेचं आहे.

तथ्यांविरुद्ध पसरवलेल्या मिथकांवर आधारित प्रचार साहित्य:

Ram Puniyani यांनी तयार केलेल्या Facts Against Myths या पुस्तकांच्या मालिकेचा वापर करून ”तथ्यांवर आधारित जनजागृती अभियान” राबवण्याची सूचना सत्रात देण्यात आली.

या सामग्रीमध्ये धार्मिक इतिहास, राजकीय प्रचार, आणि समकालीन चुकीच्या धारणा यांचे खंडन करून वैज्ञानिक व ऐतिहासिक दृष्टिकोन दिला गेला आहे.

अल्पसंख्याकांतील मूलतत्त्ववादालाही विरोध आवश्यक:

सत्रात फक्त बहुसंख्याक हिंदुत्वावर नव्हे, तर अल्पसंख्याक धर्मांतील बंदिस्त व कट्टरवादी विचारसरणीवरही स्पष्ट टीका झाली.

❑ चर्चमध्ये व मुस्लिम धार्मिक नेतृत्वामध्ये सुधारणावादी आणि समन्वयवादी संवाद घडवून आणणे हेही महत्त्वाचे आहे.

❑ धार्मिक कट्टरता कुणाकडूनही आली तरी तिचा विरोध करणे, हे लोकशाही मूल्यांचे रक्षण करण्यासाठी आवश्यक आहे.

संयुक्त कृतीसाठी मंच निर्माण करा:

या लढ्याला वैयक्तिक नव्हे, तर सामूहिक पातळीवर चालना मिळावी, यासाठी सत्रात सहभागी असणाऱ्या सर्व प्रतिनिधींनी एक Whatsapp गट तयार करून पुढील कृती, संपर्क व समन्वय यासाठी मंच स्थापन करण्याचे ठरवले.

गट चर्चा ४ - **शहरी गरीब मंच**

१. झोपडपट्टी पुनर्वसन आणि गृहनिर्माणाचा अधिकार

पूनम कनोजिया (GBGB, मुंबई), शिंदे आणि नरेश (GBGB, मुंबई) यांनी झोपडपट्ट्यांना कायदेशीर मान्यता मिळावी व मूलभूत सेवा मिळाव्यात यासाठीची लढा उभी केली आहे. त्यांनी विधानसभेतील प्रतिनिधींशी संपर्क ठेवून झोपडपट्ट्यांचे पुनर्वसन आणि संरक्षण यासाठी सातत्याने काम केले आहे. झोपडपट्टीतील नागरीकांचा आवाज स्थानिक स्वराज्य संस्थांपर्यंत पोहोचवणे आणि गृहनिर्माण हक्क सुनिश्चित करणे हे त्यांचे मुख्य उद्दिष्ट राहिले आहे. झोपडपट्ट्यांचे पुनर्वसन हे शहरातील संघर्षांमध्ये सर्वात अग्रक्रमाचा मुद्दा असावा, असे त्यांच्या मते आहे.

२. कामगार हक्क आणि असंघटित क्षेत्र

जॉन मायकेल (हैदराबाद), सिस्टर लिस्सी (तेलंगणा वर्कर्स युनियन), महेश (कर्नाटक इंडिया लेबर लाईन), बसवराज (महाराष्ट्र) यांच्यासह इतर कार्यकर्त्यांनी असंघटित कामगारांच्या हक्कांवर प्रकाश टाकला. हैदराबादमध्ये म्युसी नदी प्रकल्पाच्या पार्श्वभूमीवर कचरा वेचकांच्या प्रश्नांवर काम करण्यात आले आहे. घरेलू कामगारांसाठी स्वतंत्र कायदा तयार करणे, कामगार सल्ला केंद्र (facilitation centers) वाढवणे आणि त्यांचा कायदेशीर आधार मजबूत करणे याची गरज अधोरेखित झाली. विविध राज्यांतील कामगार संघटनांमध्ये सहकार्य वाढवण्याची गरजही मांडण्यात आली.

३. पाणी हक्क आणि मूलभूत सेवा

प्रविण व अक्षता (पाणी हक्क समिती, मुंबई) यांनी पाण्याचा सार्वत्रिक हक्क व खासगीकरणाविरोधात सुरू असलेली चळवळ

मांडली. त्यांनी पाण्याच्या उपलब्धतेसंबंधी डेटावर आधारित संशोधन व कायदेशीर कारवाईसाठी पाठबळ देण्याची तयारी दर्शवली. शहरी गरिबांना पिण्याच्या पाण्याचा हक्क सरकारकडून मिळावा, अशी मागणी त्यांनी केली.

४. स्थलांतरित व असंघटित कामगार, वेंडर हक्क

लक्ष्मण (NASVI), शंकर (गरीब मोर्चा, तेलंगणा व आंध्र), कृष्णा (आंध्र प्रदेश), रवी (साथी) यांनी स्थलांतरित कामगार, रस्ताविक्रेते व बेघर मुलांचे मुद्दे उपस्थित केले. स्ट्रीट वेंडर्स कायद्याची अंमलबजावणी प्रभावी नसल्याचे नमूद करून टाऊन वेंडिंग कमिट्यांचे सशक्तीकरण आणि क्षेत्रनिहाय झोनिंग नियमांचे पुनरावलोकन करण्याची आवश्यकता व्यक्त केली.

५. हवामान बदल व पर्यावरण न्याय

अनुषा (नागपूर), चैतन्य (तामिळनाडू), विवेक (हैदराबाद), गॅब्रिएल (तामिळनाडू) यांनी पर्यावरणीय ऱ्हास, उष्णता वाढ, पाण्याची टंचाई आणि प्लास्टिक चक्र व्यवस्थापनासंबंधी मुद्दे मांडले. शहर नियोजनात पर्यावरणपूरकता, खासकरून डोंगरी व किनारी भागात, महत्त्वाची असल्याचे त्यांनी सांगितले.

६. महिलांच्या हक्कांचा मुद्दा व सुरक्षित शहर

ललिता (आझाद युवा मंच), आफ्रोज (आझाद महिला युवा मंच), गॅब्रिएल आणि कांती (चेन्नई) यांनी महिलांच्या सुरक्षिततेसाठी लिंग–संवेदनशील शहर नियोजनाचे महत्त्व अधोरेखित केले. महिला हातमजूर, माणव रिक्षाचालक व इतर असंघटित महिला कामगारांच्या दैनंदिन संघर्षांवर त्यांनी लक्ष केंद्रित केले.

७. नागरी प्रशासन व धोरणे

मनीष (NAPM, महाराष्ट्र), नतुभाई (गुजरात), योगेंद्र (दिल्ली) यांनी शहरी धोरणांचे लोकशाही माध्यमातून परीक्षण आणि जनसहभागाचे मॉडेल्स मांडले. 'दिल्लीतली आवाज' यासारख्या उपक्रमांचा अनुभव इतर शहरांतही घेता येईल, असे त्यांनी सुचवले.

८. शिक्षण व कौशल्यविकास

विद्या (बंगळुरू), उमंग (दिल्ली NCR) यांनी असंघटित कामगारांच्या मुलांना इंग्रजी शिक्षण, प्रशिक्षण, कौशल्यविकास या माध्यमातून सशक्त करण्याचे महत्त्व मांडले. शिक्षण हा केवळ आर्थिक प्रगतीचा नव्हे, तर नागरी हक्कांचा भाग असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

९. राष्ट्रीय कार्य योजना व पुढील वाटचाल

शहर संघर्ष मंचाने पुढील वर्षासाठी ठरवलेली काही महत्त्वाची दिशा खालीलप्रमाणे आहेत:

- ❑ राष्ट्रीय परिषदेची पुनर्रचना सर्वसमावेशक प्रतिनिधित्वासह.
- ❑ दर महिन्याला नियमित बैठक उभरत्या संघर्षांचे विश्लेषण व एकत्रित कृती.
- ❑ मजबूत कृती आराखडा तयार करणे धोरण, कायदे व समुदाय पातळीवरील हस्तक्षेप निश्चित करणे.

गट चर्चा **५ - न्याय मंच - NAJAR मंच**

१. जनसामान्यांच्या बाजूने उभ्या असलेल्या वकिलांचा राष्ट्रीय मंच गरजेचा

चर्चेच्या प्रारंभिक भागातच हे ठळकपणे समोर आलं की आजच्या काळात जिथे कायदा अधिकाधिक शोषणाचं साधन बनतो आहे जनतेच्या बाजूने उभे राहणारे वकील एकत्र येण्यासाठी एक सशक्त मंच आवश्यक आहे. ही फक्त व्यावसायिक गरज नाही, तर ती एक राजकीय आणि सामाजिक गरज आहे.

२. वकिलांवर राज्यसंस्थेचे वाढते हल्ले सामूहिक प्रतिकाराची गरज

अनेक राज्यांत आणि विशेषत: आंदोलक भागांत काम करणाऱ्या वकिलांवर पोलीस प्रशासन, गुप्तचर यंत्रणा आणि कोर्ट व्यवस्थेद्वारे थेट किंवा अप्रत्यक्ष हल्ले होत आहेत. या हल्ल्यांना तोंड देण्यासाठी स्वतंत्र वकिल संघटना व एकत्रित भूमिका आवश्यक ठरत आहे.

३. न्यायव्यवस्थेतील संस्थात्मक प्रश्न स्वातंत्र्य आणि जबाबदारी

न्यायालयीन स्वायत्तता, न्यायाधीशांची जबाबदारी, आणि न्यायाच्या प्रवेशयोग्यतेसारख्या मुद्द्यांवर व्यक्तिगत स्तरावर

प्रश्न उपस्थित करणं शक्य नसतं. म्हणूनच वकिलांच्या सामूहिक हस्तक्षेपातूनच या संस्थात्मक प्रश्नांना आव्हान देता येईल, अशी चर्चा झाली.

४. खालच्या स्तरावरील चळवळींचं 'अनैतिक कायदेशीर प्रतिनिधित्व' एक गंभीर समस्या

ग्रामीण, आदिवासी आणि मागास भागांत चालणाऱ्या चळवळींना अनेकदा कायद्याच्या पातळीवर योग्य प्रतिनिधित्व मिळत नाही. काही वेळा हे प्रतिनिधित्व पांढरपेशा वर्गाच्या हेतूंनी चालवलं जातं. हे नैतिकदृष्ट्या आणि राजकीयदृष्ट्या अपायकारक ठरतं. NAJAR याला आळा घालणारा मंच असावा, अशी अपेक्षा मांडण्यात आली.

५. न्यायालयीन प्रॅक्टिसपुरती मर्यादा नको व्यापक कायदेशीर सक्रियता हवी

NAJAR चं काम कोर्टरूमपुरतं मर्यादित न राहता, कायदा म्हणजे काय, त्याचे सामाजिक परिणाम काय असतात, कायद्याचा वापर जनचळवळीत कसा करायचा, यावर विचार करणारा आणि कृती करणारा मंच म्हणून पुढे यायला हवा.

६. आंतरराज्य वकिल निर्देशिका एक संवाद व समन्वय केंद्र

जिथे विविध राज्यांत विविध चळवळी आहेत, तिथे एकमेकांना वकिलांच्या माहितीचा सहज उपयोग करता यावा यासाठी एक राष्ट्रीय कायदेशीर निर्देशिका (Legal Directory) आवश्यक आहे. NAJAR या दृष्टिकोनातून एक 'फॅसिलिटेशन सेंटर' बनावं, अशी ठोस सूचना समोर आली.

७. चळवळींना कायद्याचा अर्थ समजावून सांगणं संवादाचं सुलभीकरण

खूपदा चळवळी आणि आंदोलक कायद्याचे गुंतागुंतीचे मुद्दे समजून न घेता केवळ कायदेशीर प्रक्रिया म्हणून त्याचा उपयोग करतात. NAJAR च्या सदस्यांनी पुढाकार घेऊन चळवळींना कायद्यातील गुंतागुंती, त्याचे राजकीय–आर्थिक परिणाम व त्यावरील रणनीती समजावून सांगणं गरजेचं आहे.

८. कायद्याच्या शिक्षणपद्धतीत मूलभूत त्रुटी नवदृष्टीची गरज

आज कायद्याच्या शिक्षणपद्धतीत सामाजिक वास्तव, वंचित दृष्टिकोन, चळवळींचं योगदान किंवा प्रश्नांची राजकीय पार्श्वभूमी यांचा समावेशच नसतो. यामुळे कायदा शिकणारे विद्यार्थी व्यवस्थेच्या चौकटीतच विचार करतात. NAJAR या शिक्षणपद्धतीवर गंभीर हस्तक्षेप करू शकेल.

९. ग्रामीण व वंचित वकिलांसाठी आधारव्यवस्था तयार करणं सामूहिक कर्तव्य

ग्रामीण भागांतील, दलित, आदिवासी व महिला वकिल अनेकदा व्यवस्थेत एकटे पडतात. त्यांना सशक्त आधार देण्यासाठी एक समर्पित नेटवर्क आणि समर्थन प्रणाली उभी करणं ही NAJAR ची जबाबदारी मानण्यात आली.

गट चर्चा **६ - युवा मंच**

१. रोजगार आणि शिक्षण: असुरक्षित भविष्य

युवकांच्या दैनंदिन वास्तवात रोजगाराच्या तुटवड्याने आणि शिक्षणाच्या खाजगीकरणाने गडद सावल्या टाकल्या आहेत. शिक्षण अधिकाधिक महाग होत आहे, पण त्याच्या गुणवत्तेत सातत्याने घसरण होत आहे. स्पर्धा परीक्षांचा हव्यास असला तरी त्या सामाजिक समतेचा नव्हे, तर अपवादात्मक यशाचा मार्ग बनतात. अनेक विद्यार्थ्यांना शिक्षणात विचारस्वातंत्र्य, मूलभूत मूल्यशिक्षण व वैचारिक प्रगल्भता मिळत नाही. या व्यवस्थेने शिक्षणाचं रूपांतर केवळ नोकरी मिळवण्यासाठीचं साधन म्हणून केलं आहे. या सत्रात या परिस्थितीवर गंभीर प्रश्न उपस्थित करण्यात आले.

२. मर्यादित पर्याय आणि दिशाहीनता

शिक्षण आणि कामाच्या संदर्भात युवकांसमोर पर्याय अत्यंत मर्यादित आहेत. बहुसंख्य तरुण NEET, CUET, UPSC किंवा इंजिनिअरिंगसारख्या स्पर्धा परीक्षांच्या दबावाखाली आयुष्याचा अर्थ शोधत आहेत. पण या प्रक्रियेत ते वैचारिक, सामाजिक आणि राजकीय जाणिवांपासून दूर जात आहेत. चर्चेतील

काही सहभागी सदस्यांनी तरुणांसाठी क्रांतिकारी राजकीय आणि सामाजिक चळवळी एक पर्यायी जीवनमार्ग म्हणून उभ्या कराव्यात, अशी भूमिका मांडली.

३. राजकीय जाणीवेची गरज आणि अपुरी समज

आजच्या तरुणांमध्ये राजकीय उत्सुकता असली तरी ती बहुधा सोशल मीडियाच्या प्रभावाखाली गोंधळलेली आहे. योग्य दिशादर्शनाशिवाय ही जाणीव अपूर्ण राहते. संविधान, नागरी हक्क, लोकशाही प्रक्रिया यांचा सखोल अभ्यास केल्याशिवाय युवकांचा राजकीय हस्तक्षेप केवळ प्रतिक्रियात्मक राहतो. त्यामुळे तरुणांनी सत्ताकेंद्रांशी सहभागी नागरीक म्हणून संबंध ठेवायला हवा, ही चर्चेतील मोलाची जाणीव होती.

४. 'युवकांचा आवाज' घोषणेपलीकडचा सहभाग

'युवकांचा आवाज' म्हणजे निव्वळ घोषणाबाजी नव्हे. हा आवाज निर्णयप्रक्रियेत, धोरण निर्मितीत आणि संस्थात्मक सत्तेला प्रश्न विचारण्यात व्यक्त व्हायला हवा. शाळा, महाविद्यालये आणि विद्यापीठे या संस्था युवकांना ऐकतील, संवाद साधतील आणि त्यांचं नेतृत्व घडवतील, असं वातावरण निर्माण करणं ही आजची गरज आहे.

५. निर्णयक्षमता आणि स्वावलंबन

तरुणांमध्ये निर्णयक्षमतेचा विकास होण्यासाठी त्यांना स्वातंत्र्य, प्रयोगशीलता आणि संवादाचं पोषण मिळणं गरजेचं आहे. यासाठी शिक्षक, पालक, व संस्थांनी त्यांच्यावर विश्वास ठेवणं आणि अपयशाची भीती न दाखवणं आवश्यक आहे. निर्णय घेण्याच्या प्रक्रियेतूनच नेतृत्व जन्म घेतं, हे या सत्रात स्पष्टपणे अधोरेखित झालं.

६. राजकीय समज: रोजच्या जीवनाशी जोडलेली

राजकीय समज ही केवळ निवडणुकांपुरती मर्यादित नसावी. शहर नियोजन, शिक्षण, आरोग्य, पर्यावरण, सार्वजनिक वाहतूक, मजूर हक्क, महिला सुरक्षेसारख्या मुद्यांतही तरुणांनी हस्तक्षेप करायला हवा. 'राजकारणावर बोलू नका' ही संस्कृती मोडून काढणं हे तरुणांच्या भविष्याच्या लढ्याचा भाग मानणं गरजेचं आहे.

७. नेतृत्व: सहभागातून साकारलेलं

चर्चेतील नेतृत्व संकल्पना म्हणजे सामूहिक ऐकण्याची, समजून घेण्याची आणि लोकांच्या प्रश्नांमध्ये सहभागी होण्याची क्षमता. वैकल्पिक नेतृत्व केवळ पुढे उभं राहण्यात नसतं, तर ते चळवळींच्या रचनेत सर्वसामान्यांचा सहभाग कसा निर्माण करतो यावर आधारित असतं. यासाठी प्रशिक्षित नेतृत्व निर्माण करणं ही आजच्या संघटनांची जबाबदारी आहे.

८. झपाट्याच्या विरुद्ध दिशेने

व्हायरल माहिती, ट्रेंड्स आणि झपाट्याने बदलणाऱ्या प्रतिक्रियांच्या काळात तरुणांनी गहन अभ्यासाची आणि ऐतिहासिक–सामाजिक संदर्भांची समज अंगीकारणं आवश्यक आहे. संविधान, इतिहास, समाजशास्त्र, अर्थशास्त्र यांचा अभ्यास हेच युवकांच्या आंदोलनांचं वैचारिक बळ बनू शकतं.

९. मीरा यांचं विशेष सादरीकरण "संघटन ही एक प्रक्रिया आहे"

सत्राच्या अखेरीस मीरा (इन्कलाबी स्टुडंट्स युवा मंच) यांनी अत्यंत महत्त्वाचा मुद्दा उपस्थित केला: "युवकांना संघटित कसं करावं ?"

त्यांच्या मतानुसार, युवकांचं संघटन करण्यासाठी पुढील गोष्टी महत्त्वाच्या आहेत:

- ❑ युवकांना ऐकणं आणि त्यांच्या जीवनानुभवांवर विश्वास ठेवणं,
- ❑ त्यांच्याशी त्यांच्या भाषेत आणि शैलीत संवाद साधणं,
- ❑ स्थानिक, सांस्कृतिक व क्रीडा उपक्रमांतून नातं निर्माण करणं,
- ❑ आणि त्यांच्या प्रश्नांवर सामूहिक कृतीची उदाहरणं घडवणं.

त्यांचं निर्णायक विधान असं होतं -

''संघटन ही कार्यक्रम नव्हे, तर प्रक्रिया आहे - प्रश्नांवरून संवाद, संवादातून समज, आणि समजेतून संघटन.''

गट चर्चा ७ - महिला आणि पारलैंगिकांच्या समस्या, अधिकारांवर गट चर्चा

जन आंदोलनांच्या हैदराबाद येथे झालेल्या ३० व्या राष्ट्रीय अधिवेशनात विविध विषयांवर गटचर्चा आयोजित करण्यात आल्या होत्या. त्या पैकी एक होती, महिला आणि पारलैंगिकांच्या

समस्या, त्यांचे अधिकार आणि त्यांच्या मागण्या यावर चर्चा. या चर्चेत देशभरातून आलेल्या विविध संलग्न संघटनांच्या ४५ एक महिलांनी सहभागी होऊन आपले विचार हिरीहिरीने मांडले. त्याचा संक्षिप्त रिपोर्ट…

महिलांनी आपले विचार मांडताना प्रस्थापित पितृसत्ताक पद्धतीमुळे कित्येक शतकांपासून महिलांवर अन्याय होतो आहे तो आजच्या काळातही सुरूच आहे, यावर जोर दिला. जरी संविधानाने महिलांसकट सर्व नागरिकांना समान हक्क दिले आहेत तरी सामाजिक चौकटीत महिलांवरील अन्याय, अत्याचार थांबलेले नाहीत. यावर महिलांनी संघटित होऊन संघर्ष केल्याशिवाय एकूणच समाजात असलेली पुरुषी मानसिकता बदलणे कठीण आहे, यावर सर्व घटक संस्थांच्या महिलांनी शिक्कामोर्तब केले. या गटचर्चेचे संयोजन सुनिता, एलिना आणि मुस्कान यांनी केले. या गटचर्चेचा संक्षिप्त रिपोर्ट खालील प्रमाणे आहे.

१. आम्ही आमच्या सर्व घटक संस्थांच्या माध्यमातून कुटुंबातील हिंसाचाराविरुद्धच्या संघर्षात स्त्रीवादी आणि महिलांच्या एकत्रित प्रयत्नांना बळकटी देण्याचा संकल्प करतो.

२. आम्ही आमच्या घटक संस्थांच्या माध्यमातून सर्व स्त्री म्हणून स्वत:ची ओळख मानणाऱ्या व्यक्तींच्या शारीरिक अखंडतेसाठी, स्वायत्ततेसाठी आणि स्वनिर्णयासाठीच्या संघर्षांना बळकटी देण्याचा संकल्प करतो.

३. आम्ही आमच्या घटक संस्थांच्या माध्यमातून महिलांच्या श्रमाच्या, त्यांच्या योगदानाच्या व सर्व जमीन, जंगल, जलसंपत्तीतील त्यांच्या हक्कांच्या मान्यतेसाठीच्या संघर्षांना पाठिंबा देण्याचा संकल्प करतो.

४. आम्ही दलित महिलांवर होणाऱ्या जातीवादी प्रथांवर जसे की देवदासी प्रथा, जातीच्या चौकटी ओलांडणाऱ्या दलित महिलांवर होणारे पूर्वग्रह आणि हिंसाचार याविरुद्ध लढण्यासाठी आणि अनुसूचित जाती–जमाती अत्याचार प्रतिबंधक कायद्याच्या अंमलबजावणीसाठी लढण्याचा संकल्प करतो.

५. आम्ही ओळखपत्रे नसतानाही महिलांना संरक्षणात्मक कायद्यांचा उपयोग मिळवून देण्यासाठी त्यांच्या प्रयत्नांना आणि संघर्षांना बळकटी देण्याचा संकल्प करतो.

६. आम्ही NAPM च्या संपूर्ण कार्यात विद्यमान पितृसत्ताक मूल्यांना आव्हान देणाऱ्या, आमच्या घटक संस्थांनी स्वीकारलेल्या स्त्रीवादी आचारांचे अनुसरण करण्याचा संकल्प करतो.

७. आम्ही केंद्र सरकारकडून राज्यांतर्गत, आंतरराज्यीय आणि आंतरराष्ट्रीय महिला स्थलांतरितांचे संरक्षण आणि देखरेख करण्यासाठी धोरण तयार करण्याची मागणी करण्याचा संकल्प करतो, जेणेकरून गंतव्य स्थळी त्यांच्या सन्मान आणि सुरक्षिततेची खात्री करण्यासाठी सुरक्षित कार्यस्थिती, किमान वेतन, मोफत वैद्यकीय सेवा, सामाजिक संरक्षण, कायदेशीर मदत आणि सहाय्य यांची हमी मिळू शकेल.

8. आम्ही सर्व ट्रान्सजेंडर व्यक्तींच्या सन्मान, सामाजिक सुरक्षा आणि सर्व घटनात्मक अधिकारांसाठी चाललेल्या संघर्षांशी एकात्मता व्यक्त करण्याचा संकल्प करतो.

9. आम्ही अशा धोरणासाठी प्रचार करण्याचा संकल्प करतो जे महिलांना त्यांच्या वैवाहिक स्थितीची पर्वा न करता भारताच्या नागरिक म्हणून स्वतंत्र आर्थिक घटक म्हणून मान्यता देईल.

10. आम्ही हेही ठरवतो की, भाजपशासित राज्यांमध्ये लागू केले जात असलेल्या समान नागरिक संहितांचा (UCC) आम्ही निषेध करतो, कारण त्या व्यक्तिगत कायद्यांतील अंतर्निहित असमानता किंवा महिलांना न्यायालयात प्रवेश करताना भोगाव्या लागणाऱ्या मोठ्या अडचणी दूर करत नाहीत, उलट महिलांवर अधिक देखरेख आणि नियंत्रण वाढवतात.

गट चर्चा ८ - नागरिकत्व, 'हकालपट्टी' आणि लोकांच्या अधिकारांवरील विविध प्रकारच्या गंडांबाबत चर्चा

हैदराबाद येथे पार पडलेल्या ३० व्या नॅशनल अलायन्स ऑफ पीपल्स मूव्हमेंट्स (NAPM) अधिवेशनात NPR, NRC आणि CAA या कायद्यांवर सखोल चर्चा झाली हे कायदे कसे मुस्लिम, दलित आणि आदिवासींना त्यांच्या घटनात्मक अधिकारांपासून, विशेषत: मतदानाच्या अधिकारापासून, वंचित करण्यासाठी रचले गेले आहेत याबद्दल विचारमंथन झाले. चर्चेत विशेषत्वाने अनुसूचित जाती, आदिवासी आणि अल्पसंख्याक समुदाय, तसेच बांगलादेश व पाकिस्तानमधून आलेल्या निर्वासितांना याचा सर्वाधिक फटका बसणार असल्याचे स्पष्ट झाले. गोव्यातील लोक, विशेषत: OCI कार्डधारक, यामुळे उद्भवणाऱ्या समस्यांबाबत विशेषत: चिंतित आहेत.

चर्चेत हेही स्पष्ट झाले की CAA फक्त नागरिकत्वाचा

कायदा नसून, भारतीय जनतेच्या मोठ्या गटांना मतदार यादीतून वगळण्याचा एक डाव आहे. संपूर्ण देशातील विश्लेषणातून असे दिसून आले की या कायद्यांमुळे विविध प्रदेशांमध्ये वेगवेगळ्या समस्या निर्माण होतील . उत्तर भारत, पश्चिम बंगाल आणि गोव्यात विशेष आव्हाने उभी राहतील. अगदी ज्या राज्यांमध्ये घुसखोरीचा प्रश्न मोठा नाही, तिथेही NRC चा वापर लोकांना मतदार यादीतून वगळण्यासाठी केला जाईल.

आजच्या चर्चेतील मुख्य ठराव पुढीलप्रमाणे आहेत:

१. CAA रद्द करणे जाती, धर्म किंवा वांशिक ओळख यांची तमा न बाळगता सर्व भारतीय नागरिकांना नागरिकत्वाची मान्यता द्यावी.

२. फूट पाडणाऱ्या कायद्यांना विरोध समाजात फूट निर्माण करणाऱ्या सर्व कायद्यांना विरोध केला जाईल.

३. सामाजिक विभागणी रोखणे हे कायदे केवळ अल्पसंख्यांकांना लक्ष्य करत नाहीत, तर अनुसूचित जाती, आदिवासी व ओबीसी समुदायांमध्येही फूट निर्माण करतात.

४. NAPM ची भूमिका बळकट करणे. जनतेला गुलाम बनवण्याच्या प्रयत्नांशी लढण्यासाठी NAPM ला सक्षम करणे.

५. स्थानिक पातळीवर माहिती संकलन या कायद्यांचा स्थानिक प्रभाव नोंदवून व विश्लेषित करण्यासाठी प्रयत्न करणे.

६. जनजागृती मोहीम या कायद्यांचे परिणाम समजावून सांगण्यासाठी देशव्यापी कार्यक्रम राबवणे.

चर्चेत पुढील महत्त्वाचे मुद्देही मांडले गेले:

१. भाजप सरकारची द्वितीय श्रेणी नागरिकत्वाची धोरणे मोदी सरकार त्यांच्या धोरणांमधून व राजकारणातून मुस्लिम, दलित आणि आदिवासींना द्वितीय श्रेणी नागरिक म्हणून वागवत आहे. आम्ही या हल्ल्यांचा विरोध करतो आणि 'हिंदी, हिंदू, हिंदुस्थान' या भाजप–आरएसएसच्या संकुचित विचारसरणीला विरोध करतो व भारताच्या विविधतेचा पाठिंबा करतो.

२. आदिवासी आणि स्थानिक जमातींचे विशेष हक्क पाचवी व सहावी अनुसूचीतील आदिवासी व स्थानिक जमातींच्या अधिकारांना पाठिंबा व या तरतुदी कमकुवत करण्याच्या प्रयत्नांचा विरोध.

३. जातीय जनगणना व आदिवासी धर्म संहितेची मागणी देशात जातीनिहाय जनगणना व्हावी आणि आदिवासी धर्मासाठी स्वतंत्र नोंद असावी.

४. मुस्लिम नागरिकांना बांगलादेशी व रोहिंग्या म्हणून लक्ष्य करण्याचा भाजपचा प्रयत्न आहे. आम्ही याचा विरोध करतो आणि सत्यशोधन, माहिती अधिकार व जनआंदोलनांद्वारे या दाव्यांचे खंडन करतो.

५. निर्वासित व स्थलांतरितांबाबत जबाबदारी; सर्व देशांची जबाबदारी आहे की वैध कागदपत्र नसलेल्या निर्वासित व स्थलांतरितांच्या कल्याणाची काळजी घ्यावी. भारताने बंदीछावण्या उभारण्याऐवजी आपली जबाबदारी स्वीकारावी.

या सर्व मुद्द्यांवर सर्व संघटनांनी एकत्र येण्याचे आवाहन करण्यात आले.

चर्चेचा निष्कर्ष असा निघाला की, CAA केवळ अल्पसंख्यांकांना लक्ष्य करणारा कायदा नाही, तर सर्व वंचित समुदायांना नागरिकत्व व मतदानाच्या अधिकारांपासून दूर ठेवण्याचे एक व्यापक धोरण आहे. त्यामुळे या मुद्द्याची जनतेत प्रबोधन करणे आणि एकत्रित संघर्ष उभारणे अत्यावश्यक आहे.

गट चर्चा ९ - राष्ट्रीय स्वास्थ्य अधिकार समन्वय

जन आंदोलनांचा राष्ट्रीय समन्वय सार्वजानिक आरोग्य सेवा बळकट व्हावी याकरिता प्रयत्नशील आहे मागील २५ वर्षांपासून. एन ए पी एम हा जन स्वास्थ्य अभियानाचा संस्थापक सदस्य आहे.नर्मदा बचाओ आंदोलन सारख्या काही क्षेत्रांत आपण आरोग्याचा हक्क मिळावा म्हणून आग्रही राहीलेलो आहोत.तसेंच सामाजिक आरोग्यसेवांवर समाज आधारित देखरेख (कम्युनिटी बेस्ड मॉनिटरिंग)करण्यांत स्थानिक व गाव स्तरावरील अनेक समुह व कार्यकर्ते कार्यरत आहेत.मात्र आपण आरोग्याचा हक्क म्हणजे केवळ आरोग्यसेवा असे मानत नाही.ज्याला आरोग्याचे सामाजिक कारक म्हणजे सोशल डियरमिन्नटस् आँफ हेल्थ म्हणतात म्हणजे सकस व पोटभर आहार (पोषण),शुध्द पिण्याचे व वापरण्या करिता पुरेसे पाणी,सांडपाणी व्यवस्था, प्रदुषण विरहीत शुध्द हवा व हवेशीर निवारा हे सर्वच जनतेचे हक्क व शासनाची जबाबदारी आहे, असे आपण मानतो.

ते मिळावेत यासाठी आपआपल्या क्षेत्रांत लढतो आहोत."कोविड टाळेबंदीच्या काळांत या सर्व गोष्टींचे महत्व अधिकच जाणवले.जात,धर्म,लिंग,शारीरीक व आर्थिक क्षमता

याआधारे भेदभाव केल्या न जाता, सर्वांना दर्जेदार,मोफत व सहज जवळ सार्वजनिक आरोग्यसेवा उपलब्ध व्हावी,ती कुणालाही नाकारली जाऊ नये, खाजगी रुग्णालयांकडून पेशन्टसची लूट केली जाऊ नये म्हणून त्यावर अंकुश ठेवल्या जावा याची गरज प्रकर्शाने जाणवली. मागील वर्षभरांत समन्वयाशी संलग्न आदोलने व आरोग्याचा हक्क महत्वाचा मानला जावा असे मानणारे समाजातील कार्यकर्ते मिळून राष्ट्रीय स्वास्थ्य अधिकारमंच गठीत करण्याची प्रक्रिया सुरुं झाली.

हैद्राबाद येथील संमेलनाच्या गटचर्चेत दहाबारा राज्यांतून पन्नासहून अधिक प्रतिनीधींनी आपआपल्या परिसरांत जाणवणारे प्रश्न, अडचणींची मांडणी केली आणि सामुहिक प्रयत्नांतून परिस्थिती सुधारण्यासाठी कटीबध्दता व्यक्त केली.दक्षिणेतील विविध भाषांमधून व्यक्त होणाऱ्यांचे मुद्दे हिंदी व इंग्रजीतून आम्हाला समजावून देणाऱ्यांचे विशेष आभार.

गटचर्चेतून पुढे आलेल्या मुद्द्यांवर काम पुढे नेण्याकरिता काहींनी स्वच्छेने जबाबदारी सुध्दा उचलली. लवकरच या सर्व सहभागींसह व हैद्राबादला पोहचूंच न शकलेल्या किंवा तिथल्या अन्य समांतर गटांत गेल्यामुळे या चर्चेत भाग न घेऊ शकलेल्या सर्वांसोबत लवकरच ऑनलाईन मिटिंग घेऊन पुढील कृतीकार्यक्रम निश्चित केल्या जाईल.

एन ए पी एम म्हणजे आपल्या समन्वयाशी संलग्न हा मंच विविध राज्यांतील संघर्षक्षेत्रातील मुद्दे समजावून घेत राज्यातील प्रशासनाशी संवाद व जन जागृती करत काही धोरणात्मक बदलांसाठी प्रयत्नशील असेल. यासाठी आपण अन्य मंचातील कार्यकर्त्यांची देखिल मदत घेऊं.

या गटचर्चेतून पुढे आलेल्या मुद्द्यांच्या आधारे घेण्यांत आलेले निर्णय पुढील प्रमाणे:

१. युनिव्हर्सल हेल्थ केअर म्हणजेच सर्वांना कोणताही भेदभाव न करता सार्वजनिक आरोग्यसेवा पुरविणे ही शासनाची जबाबदारी आहे. भारतीय संविधानातील कलम २१ नुसार सन्मानाने जगण्याच्या हक्कांत आरोग्यदायी जीवन जगणे हा लोकांचा हक्क आहे (आधारकार्डाचा अडसर नको), असे मान्य करण्यांत यावे यासाठी आम्ही आग्रही राहू.

२. राजस्थानप्रमाणे सर्व राज्यांमध्ये आरोग्याचा हक्क या संदर्भांत कायदा करण्यात यावा यासाठी आम्ही पाठपुरावा करु. या कायद्यांत केवळ आरोग्यसेवाच नाही तर आरोग्याच्या सामाजिक कारकांचा देखिल समावेश करण्यात यावा अशा सुधारणा व्हाव्यांत याकरिता पाठपुरावा करु.

३. गावपाड्यांपासून जिल्हास्तरापर्यंत विविध स्तरांवरील आरोग्य समितीचे गठन करण्यांत यावे,त्या विविध वंचितांनाही प्रतिनीधीत्व मिळावे,या समित्या कार्यरत रहाव्यांत म्हणून यांत स्थानिक आरोग्य कार्यकर्त्यांला सहभागी करुन घेतले जावे यासाठी आम्ही पाठपुरावा करुं.

४.महिलांच्या व बालकांच्या आरोग्यावर विशेषभर दिला जावा असे आम्ही मानतो.पश्चिम बंगालमध्ये मातृत्व अनुदान योजना २०२१ पासून बंद करण्यांत आलेली आहे,याचा आम्ही सर्व तीव्र निषेध करतो. ती पुन्हा तातडीने सुरु केली जावी यासाठी सुरु असलेल्या लढ्यांना हा मंच पाठिंबा व्यक्त करतो.

५.रुग्णांना लवकर हास्पिटल पर्यंत पोहचवता यावे म्हणून दुर्गम,आदिवासी भागांत रस्त्यांची सोय करण्यात यावी.

६. जिल्हा रुग्णालयांच्या खाजगीकरणाची प्रक्रिया तात्काळ थांबविण्यांत यावी.

७.प्राथमिक आरोग्य केंद्रांत २४ तास सेवा मिळावी,तिथे पिण्याचे स्वच्छपाणी मिळावे.स्वच्छतागृहांत वापरण्यासाठी नियमितपणे पुरेसे पाणी उपलब्ध करुन देण्यांत यावे याकरिता आम्ही पाठपुरावा करुं.

८.अनेक राज्यांमध्ये दारु व व्यसनाधिनतेचा प्रश्न असल्यामुळे प्राथमिक आरोग्यकेंद्र स्तरावर समुपदेशनाची व्यवस्था करण्यांत यावी अशी आमची मागणी आहे.

९.आरोग्यासाठी पोषण महत्वाचे असते म्हणून ग्रामीण व शहरी गरीबांना दिल्याजाणाऱ्या रेशनमध्ये बाजरी,ज्वारी,रागी यासारख्या अधिक पोषक भरड धान्याचा नियमित पुरवठा करता यावा असा आमचा आग्रह आहे.

१०.''अधिक पोषण मूल्य असलेला'' या नावाने जो कम्पन्याचा फॉरटीफाईड तांदुळ किंवा काही तेल असे जी एम खाद्य पदार्थ पुरविले, जातात ते तात्काळ थांबवावे.

११.प्राथमिक आरोग्यकेंद्रात दर्जेदार औषधांचा पुरवठा व्हावा व ती मोफत मिळावीत.

१२.आवश्यक त्या सर्व वैद्यकीय चाचण्या प्राथमिक

(पान २९ वर)

खास वृत्तांत

राज्यघटना आणि लोकशाहीचे रक्षण करण्यासाठी राजकीय पक्ष आणि जनआंदोलनांची भूमिका

सिरत सातपुते

हैदराबाद अधिवेशनाच्या अंतिम दिवशी, 4 मार्च 2025 रोजी विविध राजकीय पक्षांच्या प्रतिनिधींनी जनआंदोलनांशी महत्त्वपूर्ण संवाद साधला. लोकशाहीचे रक्षण करणे, संविधानाचे रक्षण करणे आणि लोकाभिमुख धोरणे सुनिश्चित करणे यावर या सत्रात चर्चा झाली. जनआंदेलनांचा राष्ट्रीय समन्वयाच्या नेत्या मेधा पाटकर यांच्या अध्यक्षतेखाली मीनाक्षी नटराजन (काँग्रेस), क्लिफ्टन डी'रोझारियो (सीपीआयएमएल), जावेद अली खान (समाजवादी पक्ष), ॲनी राजा (सीपीआय), अशोक ढवळे (सीपीआयएम), प्रा. कोदंडराम (तेलंगणा जनसमिती) आणि तेलंगणा, केरळ, उत्तर भारतामधील तळागाळातील कार्यकर्त्यांनी या चर्चेत भाग घेतला. या सत्राचे सूत्रसंचालन NAPM चे राष्ट्रीय संयोजक डॉ. संजय मंगला गोपाळ यांनी केले.

जनआंदोलनांचा राष्ट्रीय समन्वयाच्या नेत्या मेधा पाटकर यांनी आम्ही थेट राजकीय पक्षाच्या माध्यमातून निवडणुकीच्या राजकारणात उतरत नाही. मात्र, आम्ही निवडणुकीच्या राजकारणाला पूर्णपणे नकारही देत नाही. आमच्या दृष्टिकोनातून, भारताचा लोकशाही मार्ग संविधानाने ठरवून दिलेला आहे. नागरिकांना केवळ मतदार म्हणून नव्हे, तर संपूर्ण हक्क आणि जीवन जगण्याचा अधिकार असलेले व्यक्ती म्हणून आम्ही पाहतो. आमच्या दृष्टीने, आमची भूमिका म्हणजे लोकशाही आणि संविधानिक मूल्यांचे रक्षण करणे अशी थेट भूमिका मांडत चर्चेला सुरुवात केली. आम्हाला जात, धर्म, लिंग आणि आर्थिक विषमता वाढवणाऱ्या धोरणांविरोधात राजकीय पक्षांची स्पष्ट भूमिका हवी आहे असा आग्रहही त्यांनी धरला. राजकीय पक्ष लोकशाही प्रक्रियेत भाग घेतात, मात्र त्यांना जन आंदोलनांच्या भूमिका समजून घ्याव्या लागतील. संविधानाच्या शपथेप्रमाणे, सर्व राजकीय पक्ष संविधानाचे रक्षण करण्यासाठी कटिबद्ध राहतील का? असा खडा सवाल मेधाताईंनी उपस्थित राजकीय पक्ष प्रतिनिधींना केला.

राष्ट्रीय नदीघाटी मंच, पर्यावरण आणि हवामान बदल मंच, किसान मंच, महिला मंच, युवक मंच आणि कायदा–संविधान मंच अशा विशेष मंचांचा उल्लेख करुन मेधाताईंनी नद्या आणि पर्यावरण संरक्षण, शेती आणि शेतकऱ्यांचे प्रश्न, महिला हक्क आणि सामाजिक न्याय, श्रमिक आणि असंघटित कामगारांचे प्रश्न, शहरी गरीब आणि विकास धोरणे, संविधान आणि न्यायव्यवस्था या विविध विषयांतील प्रश्नांची जंत्रीच उलगडली.

राजकीय पक्षांची भूमिका मांडताना समाजवादी पक्षाचे नेते आणि जावेद अली खान यांनी कबूल केले की राजकीय पक्ष अनेकदा लोकांच्या अपेक्षा पूर्ण करत नाहीत. आम्हा राजकीय लोकांपेक्षा आंदोलक निर्भय असतात. कधी कधी आमची मजबुरी असते. जनआंदोलने आम्हाला मार्ग दाखवतात. काही कायदे जनआंदोलनाच्या दबावामुळे बनवले जातात. म्हणूनच जनआंदोलनांच्या कार्यकर्त्यांनी राजकीय पक्षांवर दबाव टाकत राहावे असे आवाहनही जावेद अली खान यांनी याप्रसंगी केले.

निवडून आलेल्या राज्यकर्त्यांनी कायदे बनवताना विरोधी पक्षाच्या प्रतिनिधींचेही मत योग्य असल्यास मान्य केले पाहिजे. लोकशाहीत लोकप्रतिनिधींचे बोलणे ऐकले पाहिजे. पण आज हे होताना दिसत नाही, अशी खंत जावेद अली खान यांनी व्यक्त केली. भाजपला फॅसिझम आणायचा आहे. आपण त्याचा विरोध करायला हवा. राज्यघटनेचे रक्षण करणे हे आपले कर्तव्य आहे. संविधान धोक्यात आले आहे असे वाटल्यावर लोक सावध होतात. लोकांना त्यांचे संवैधानिक अधिकार जाणून घ्यावे लागतील, त्यांना त्यासाठी लढावे लागेल. समाजवादी पक्ष या लढाईत जनआंदोलनांच्या सोबत असेल असे आश्वासनही खान यांनी यावेळी दिले.

सत्ताधारी वर्गाचा लोकांवरील हल्ला अधिक तीव्र आणि बदलत्या स्वरूपाचा झाला आहे असे सांगत क्लिफ्टन डी'रोझारियो (सीपीआयएमएल), यांनी बदलत्या परिस्थितीचा आढावा घेतला. "आजची परिस्थिती फॅसिझम (हुकूमशाही) निर्माण करणारी आहे. याचा परिणाम असा आहे की कोणताही नागरिक या देशात सुरक्षितपणे जगू शकत नाही. फॅसिझमचा पाया भारतीय जातिव्यवस्था आहे,

पुरुषसत्ताक व्यवस्था आहे, आणि तीच आता मोठ्या कॉर्पोरेट भांडवलदारांच्या हातात दिली जात आहे. आज कामगार कायदे बदलले जात आहेत. 1948 सालचा किमान वेतन कायदा किंवा इतर 100 वर्षांपूर्वीचे कायदे हे सरकारने दिलेले नाहीत, तर मजुरांनी आपल्या रक्त आणि घामाने मिळवले आहेत. 8 तासांचा कामाचा हक्कही कामगारांनी लढून मिळवला होता. आज भांडवलदार वर्ग 70-80 तास काम करण्याची सक्ती करत आहे. पंतप्रधान स्वत: सांगतात की ते केवळ ३ तास झोपतात, पण प्रश्न असा आहे की कामगारांना किती तास काम करायला लावले जाते ?"

पूर्वी जनसंघटनांना असे वाटत असे की राजकारणापासून दूर राहावे, परंतु आजच्या परिस्थितीत जनआंदोलने आणि राजकारण यांच्यातील भेद मिटला आहे. पूर्वी लोकांना राजकारणावर विश्वास नव्हता, पण आता परिस्थिती वेगळी आहे. पूर्वी आंदोलने घर वाचवण्यासाठी होत असत, पण आज ती देश वाचवण्यासाठी होत आहेत. संविधानाचे रक्षण करण्यासाठी लढा सुरू आहे. याबाबत समाधान व्यक्त करुन फॅसिझम, भांडवलशाही आणि जातीय–सामंतवादी शक्तींच्या या परस्परसंबंधित दडपशाहींना आव्हान देण्याचे जनआंदोलनांना आवाहन केले. 'आज जंगल वाचवायचं आहे, जमीन वाचवायची आहे, आणि हक्क वाचवायचे आहेत', तर ही लढाई भांडवलशाही विरोधात लढावीच लागेल. 'आम्हाला भांडवलशाहीही हवी आणि न्यायही हवा' हे शक्य नाही. जर कामगार, शेतकरी, दलित, आदिवासी आणि सर्व श्रमिक वर्गाला चांगले जीवन जगायचे असेल, तर ही लढाई भांडवलशाही आणि फॅसिझमविरोधात लढावीच लागेल." असे परखड मत क्लिफ्टन यांनी व्यक्त केले.

"आजच्या घडीला आपण सर्व एका महत्त्वाच्या मुद्द्यावर सहमत आहोत – परिस्थिती पूर्णपणे बदललेली आहे. 2024च्या लोकसभा निवडणुकीने ही बदललेली परिस्थिती स्पष्ट दाखवली. या निवडणुकीत तीन महत्त्वाच्या गोष्टी घडल्या. विरोधी पक्षांनी पहिल्यांदाच मोठ्या प्रमाणावर एकत्र निवडणूक लढवली. भाजपने '400 पार' करण्याचा दावा केला होता, पण ते 240 जागाही पार करू शकले नाहीत. त्यांचा अहंकार मोठ्या प्रमाणात कमी झाला. याशिवाय, जर भाजपला अपेक्षित यश मिळाले नाही, तर त्यामागे फक्त राजकीय पक्ष नव्हते, तर जनआंदोलनेही मोठी शक्ती बनली. संपूर्ण देशभरात लोक एकत्र आले आणि भाजपला हरवण्यासाठी काम केले." अशा शब्दांत त्यांनी जनआंदोलनांच्या सहभागाविषयी गौरवोद्गार काढले.

तेलंगणा जनसमितीचे प्रा. कोदंडराम यांनी जर राजकारण योग्य मार्गाने चालत नसेल, राजकीय व्यवस्था बिघडलेली असेल, तर जनआंदोलन पुढे जाणे कठीण होते. अशा परिस्थितीत, जनआंदोलनांना राजकारण सुधारण्याची जबाबदारी स्वीकारावी लागते असे महत्वाचे विधान या प्रसंगी बोलताना केले. बदल घडवण्यासाठी सर्वप्रथम आपल्याला स्वत:मध्ये बदल घडवावा लागेल. आंदोलनाच्या माध्यमातून राजकीय व्यवस्थेतील परिवर्तन शक्य आहे. पैसा केंद्रित राजकारण संपवून, लोकांची सत्ता आणण्यासाठी प्रयत्न करणे गरजेचे आहे असे प्रतिपादनही त्यांनी केले.

पूर्वी पैसा नसतानाही लोक निवडणुका जिंकू शकत होते. पण आज परिस्थिती वेगळी आहे. आज बहुसंख्य राजकीय पक्ष पैशाच्या जोरावर निवडणुका जिंकतात आणि सत्तेचा वापर स्वत:च्या फायद्यासाठी करतात. दुसरीकडे, आम्ही लोककेंद्रित पर्यायी राजकारण उभं करण्याचा प्रयत्न करत आहोत. ही वाट सोपी नाही, कारण लोकांना फक्त पैसे कमविण्याचं राजकारण माहीत आहे. परंतु आपल्याला लोकशाही आणि संविधान मजबूत करण्याच्या मार्गाने पुढे जायचं आहे. जर आपण विकासाचे वेगवेगळे मॉडेल स्वीकारले नाहीत, छोट्या शेतकऱ्यांना आणि लघुउद्योगांना सक्षम करण्यासाठी योजना आखल्या नाहीत, तर पर्यायी राजकारण यशस्वी होणार नाही. अशा शब्दांत प्रा. कोदंडराम यांनी पर्यायी राजकारणाची दिशा स्पष्ट केली. ही लढाई लढण्यासाठी आपल्याला एकत्र यावं लागेल. लोकशाही वाचवण्यासाठी, संविधान वाचवण्यासाठी, आणि राजकीय व्यवस्थेमध्ये परिवर्तन घडवण्यासाठी सर्वांनी मिळून काम करायला हवं असं आवाहन प्रा कोदंडराम यांनी यावेळी उपस्थितांना केले.

राजकीय पक्ष मोठ्या कॉर्पोरेट कंपन्यांच्या बाजूने असतात. त्यांना लोकांचे प्रश्न ऐकायचे नसतात. महात्मा गांधींनी लोकांबरोबर संवाद साधला, पण आजच्या राजकीय पक्षांना फक्त प्रकल्पांमध्ये रस आहे. त्यांनी कोणतेही मोठे प्रकल्प आखले की, ते फक्त प्रमुख व्यक्तींशी चर्चा करतात, सर्वसामान्य लोकांशी नाही अशा कठोर शब्दांत केरळमधील जनआंदोलनातील साथी कुसुमा सत्यम यांनी राजकीय पक्षांवर टीका केली.

आज केरळमध्ये मोठ्या बहुराष्ट्रीय कंपन्यांचे प्रकल्प राबवले जात आहेत, पण या निर्णयांमध्ये सर्वसामान्य लोकांचा

सहभाग नाही. सरकार लोकांना विश्वासात घेत नाही. येथे भाजप सरकार नाही, ही चांगली गोष्ट आहे. पण डाव्या पक्षाचे सरकारही अल्पसंख्याक आणि आदिवासींविरोधात आहे. ते गरीब लोकांचा विचार करत नाहीत. हेच आपले मोठे संकट आहे असे स्पष्ट प्रतिपादन सत्यम यांनी केले.

केरळमधील तळागाळात काम करताना आंदोलकांना सामना करावा लागणाऱ्या परिस्थितीशी साथी कुसुमा यांनी उपस्थितांना अवगत केले. त्या म्हणाल्या, "मच्छीमार समाजावर मोठा अन्याय झाला, पण पोलिसांनी त्यांचा आवाज दडपून टाकला. अनेक आंदोलनांना पोलिसांच्या मदतीने चिरडण्यात आले. मी या आंदोलनांना पाठिंबा दिला आणि आता माझ्यावरच गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. सत्ताधारी पक्षाच्या एका मोठ्या सभेच्या दिवशी मी रस्ता अडवला, असा आरोप माझ्यावर ठेवण्यात आला. जर आम्ही सरकारच्या विरोधात आंदोलन केले, तर ते आमच्यावर गुन्हे दाखल करतात. केरळमध्ये सध्या ही परिस्थिती आहे. माझा प्रश्न असा आहे की, या सत्ताधारी पक्षाचा कार्यकर्ता असे नियम मोडतो, तेव्हा त्यांच्यावर कारवाई का होत नाही? आम्हाला या प्रश्नांवर मोठे आंदोलन उभारावे लागेल."

उत्तर भारतातील जनआंदोलनातील साथी रुचा सिंग यांनी राजकीय पक्षांच्या प्रतिनिधींसमोर उत्तर प्रदेशातील जनआंदोलनांची वर्तमान परिस्थिती मांडली. उत्तर प्रदेशात जनआंदोलनांचा आवाज दबवण्यासाठी जबरदस्ती केली जात आहे या वास्तवाची त्यांनी उपस्थितांना जाणीव करुन दिली. सर्व साथी आणि छोट्या मजुरांनी एकत्र येऊन संघर्ष करण्याची गरज आहे असे आवाहन त्यांनी या प्रसंगी केले.

"संपूर्ण देशात जबरदस्त ध्रुवीकरण घडवून आणले जात आहे. हिंदुत्वाच्या नावाखाली सर्व प्रश्न गौण केले जात आहेत. महाकुंभ, कावड यात्रा यासारख्या धार्मिक कार्यक्रमांमध्ये सामान्य लोकांचा आवाज दडपला जातो. धर्माच्या नावावर शोषण केले जाते. महिलांच्या शोषणाची स्थिती तर आणखीनच भयंकर आहे. मुस्लिम महिलांना तर असुरक्षिततेने घेरलेले आहे. जर एखाद्या गायीला हानी पोहोचली, तर आपण तुरुंगात जातो, पण जर गायीच्या नावाखाली लोक मारले गेले, तर काहीच होत नाही हे फारच दुख:द आहे''

शेतकऱ्याच्या प्रश्नांबरोबरच जमीन मालकीचा मोठा प्रश्न आहे. दलित शेतकरी आणि मजूर यांना मिळणाऱ्या दुय्यम वागणूकीमुळे त्यांची अवस्था कायम दुर्लक्षित राहते. मजुरांच्या आणि त्यांच्या मुलांच्या परिस्थिती बिकट आहे. बेरोजगारीच्या वाढत्या संकटामुळे तरुणांकडे स्थलांतराशिवाय कोणताही पर्याय नाही. या कठीण परिस्थितीत आपल्या राजकीय पक्षांनी काय भूमिका घेतली आहे? असा खडा सवाल साथी रुचा सिंग यांनी या प्रसंगी केला.

2025 किंवा 2027 पर्यंत त्यांची कोणतीही स्पष्ट रणनीती दिसत नाही. 2024 च्या निकालातून आपण काही शिकू शकतो का? उत्तर प्रदेशातील राजकीय पक्षांकडून विशेषत: समाजवादी पक्षाकडून आम्हाला मोठ्या अपेक्षा होत्या. पण फक्त लग्नकार्य, मुंडन यावर मतं मिळणार नाहीत. रस्त्यावर उतरावे लागेल. राजकीय पक्षांना आंदोलनाची तयारी करावी लागेल असं परखड मत त्यांनी याप्रसंगी बोलताना व्यक्त केले.

सीपाआयच्या ॲनी राजा यांनी सर्वांना आठवण करून दिली की इंडिया आघाडीने आशा वाढवल्या आहेत. परंतु त्यांनी लोकांच्या संघर्षांना उत्तरदायी असले पाहिजे अशी अपेक्षाही असल्याचे त्यांनी यावेळी व्यक्त केली. त्या आभासी स्वरुपात या सत्रात सामिल झाल्या होत्या.

"आम्ही हे विसरलो आहोत की कार्यकर्ता काय असतो? आम्हाला वाटते की सत्ता कुठूनतरी वरुन सरकार आल्यावर मिळते आणि आमचं हे काम आहे की ते जे वर बसलेले आहेत त्यांच्या मागे पुढे फिरत राहावे आणि मग तिथून काही छोटं मोठं मिळवणे गाडी पोलीस कर्मचारी वगैरे, ती सत्ता आहे. आम्ही हे विसरलो आहोत की खरा कार्यकर्ता हा आपली सत्ता मिळवतो ती लोकांकडून, जनआंदोलनांकडून! म्हणून जनआंदोलनांबरोबरचा संवाद खूप महत्वाचा आहे'' अशा शब्दांत अखिल भारतीय काँग्रेस कमिटीच्या तेलंगणा राज्याची प्रभारी व माजी खासदार मिनाक्षी नटराजन यांनी जनआंदोलनांचे महत्व अधोरेखित केले. मिनाक्षी नटराजन यांचे वरील वक्तव्य या सत्रातील संविधान आणि लोकशाहीच्या रक्षणात राजकीय पक्ष आणि जनआंदोलनांची भूमिका निश्चितच स्पष्ट करणारे! राजकीय पक्षांना जनआंदोलनांशी जोडणारे!

(मिनाक्षी नटराजन यांचे या सत्रातील सविस्तर मनोगत मागील एप्रिल २०२५ च्या अंकात उपलब्ध आहे.)

(या अहवाल लेखनात वैभवी आढाव हिचा सहभाग आहे)

सिरत सातपुते
satputesirat@gmail.com

खास वृत्तांत

तेलंगणा केंद्रित चर्चा आणि ऐतिहासिक लढ्यांचा वारसा

मीनल उत्तुरकर

NAPM राष्ट्रीय अधिवेशनाच्या दुसऱ्या दिवशी तेलंगणातील लोकसंघर्षांवर विशेष लक्ष केंद्रित करण्यात आले. राज्याने ऐतिहासिक शेतकरी विद्रोह, मजूर संघटनांचे लढे आणि नागरी हक्क चळवळींचा समृद्ध वारसा जपलेला आहे. या सत्रात, तेलंगणातील कार्यकर्त्यांनी आपल्या चालू संघर्षांवर प्रकाश टाकला आणि भविष्यकालीन लढ्यांसाठी नवीन धोरणे मांडली.

१) तेलंगणातील ऐतिहासिक लोकसंघर्षांचा वारसा तेलंगणा हे शेतकरी आणि कामगार चळवळींचे केंद्र राहिले आहे. या सत्रात इतिहासातील काही महत्त्वाच्या आंदोलनांचा आढावा घेण्यात आला:

तेलंगणा शेतकरी सशस्त्र संघर्ष (1946-1951) - जमीनदारी व्यवस्थेविरोधात झालेल्या या उठावाने शेतीसाठी जमीन, शोषणविरहित समाजरचना आणि लोकशाही हक्कांची मागणी केली. या लढ्यामुळे शेतमजुरांना जमिनीचे हक्क आणि जातीय अत्याचारांविरुद्ध संरक्षण मिळवण्यात यश आले.

तेलंगणा राज्य आंदोलन (2001-2014) - आर्थिक आणि राजकीय अन्यायाविरोधात २१व्या शतकातील एक मोठे जनआंदोलन, ज्यामुळे अखेर २०१४ मध्ये स्वतंत्र तेलंगणा राज्याची निर्मिती झाली. या चळवळीने शेतकरी, कामगार, विद्यार्थी आणि दलित-आदिवासींना एकत्र आणले.

नक्षलवादी चळवळ आणि तिचा प्रभाव - १९७० आणि ८० च्या दशकात तेलंगणात सशस्त्र डावी चळवळ वाढली. यामध्ये भू-सुधारणा, दलित-मागासवर्गीय अधिकार आणि सामंतशाही विरोधात संघर्ष केंद्रस्थानी होते. राज्याने मात्र यावर कठोर दडपशाही करत अनेक कार्यकर्त्यांना तुरुंगात टाकले आणि ठार मारले.

२) तेलंगणातील चालू संघर्ष आणि प्रमुख समस्या
(अ) शेतकरी आणि जमीन संघर्ष

तेलंगणात आजही मोठ्या प्रमाणावर जमीन अधिग्रहण, बँक कर्जमाफीची टाळाटाळ आणि सिंचन प्रकल्पांमुळे शेतकयांचे विस्थापन होत आहे.

धान आणि कापूस शेतकऱ्यांचे संकट - सरकारच्या धोरणांमुळे MSP (किमान आधारभूत किंमत) प्रभावीपणे मिळत नाही. खाजगी कंपन्यांवर अवलंबित्व वाढल्याने शेतकरी आर्थिक संकटात सापडले आहेत.

भूमिहीन दलित-आदिवासी शेतकऱ्यांचा संघर्ष - अनेक दशकांपासून शेतजमिनीवर हक्कासाठी आदिवासी आणि दलित शेतकरी संघर्ष करत आहेत.

मल्कापूर आणि अमरावतीतील जबरदस्तीने घेतलेल्या जमिनींचा मुद्दा - विकासाच्या नावाखाली सरकार मोठ्या प्रमाणावर जमिनी अधिग्रहित करत असून, त्याविरोधात शेतकरी संघटनांनी तीव्र आंदोलन छेडले आहे.

(ब) खाणकाम आणि पर्यावरणीय संकट

तेलंगणामध्ये खाणकाम आणि वनीकरणाचे प्रश्न गंभीर बनले आहेत.

सिंगरेणी कोलरीज आणि कोळसा खाणींमुळे हजारो विस्थापित - या खाणींमुळे स्थानिक आदिवासींचे मोठ्या प्रमाणावर विस्थापन झाले आहे.

हसदेव जंगल आणि कोळसा खाणीचा विरोध - स्थानिक आदिवासी आणि शेतकरी वनांचे खाजगीकरण आणि कोळसा खाणींच्या विस्ताराविरोधात लढत आहेत.

गोदावरी आणि कृष्णा नदीवरील प्रकल्प - या जलप्रकल्पांमुळे हजारो शेतकऱ्यांचे जमिनी आणि पाणी स्रोत नष्ट होत आहेत.

(क) महिला आणि लिंगाधारित हिंसाचाराविरोधातील संघर्ष

तेलंगणातील महिलांविरोधात लैंगिक हिंसा, मानवी तस्करी आणि कामाच्या ठिकाणी शोषणाच्या घटना वाढत आहेत.

दिशा हत्याकांड आणि पोलिस एन्काऊंटर - २०१९

मध्ये दिशा या तरुणीवर झालेल्या अत्याचारानंतर पोलिसांनी चार आरोपींना ठार मारले. मात्र, कार्यकर्त्यांनी यावर आक्षेप घेत, लोकशाही मार्गाने न्याय मिळावा अशी मागणी केली.

कामाच्या ठिकाणी महिलांचे लैंगिक शोषण - असंघटित क्षेत्रात काम करणाऱ्या महिलांना वेतन भेदभाव, लैंगिक छळ आणि किमान वेतन न मिळण्याच्या समस्या भेडसावत आहेत.

देवदासी प्रथा विरोधातील चळवळ - तेलंगणातील काही भागांमध्ये देवदासी प्रथा अद्यापही अस्तित्वात आहे. महिलांचे लैंगिक शोषण थांबवण्यासाठी सामाजिक चळवळी सुरू आहेत.

(ड) दलित, आदिवासी आणि ट्रान्सजेंडर समुदायांचे हक्क

तेलंगणातील दलित, आदिवासी आणि LGBTQ+ समुदाय अजूनही सामाजिक आणि आर्थिक अन्यायाचा सामना करत आहेत.

जाती-आधारित अत्याचार आणि बहिष्करण - अनेक दलित आणि आदिवासींना अजूनही त्यांच्या हक्कांपासून वंचित ठेवले जात आहे.

ट्रान्सजेंडर समुदायाच्या मूलभूत हक्कांसाठी संघर्ष - रोजगार, आरोग्यसेवा आणि ओळखपत्रांच्या अभावामुळे ट्रान्स समुदायाला मोठ्या समस्यांना सामोरे जावे लागते.

गरीब सामान्यांसाठी सामाजिक सुरक्षेची मागणी - बेघर, बेरोजगार आणि गरीब नागरिकांसाठी अधिक सामाजिक सुरक्षा उपायांची गरज आहे.

meenalutturkar16@gmail.com

(खास वृत्तांत: पान २४ वरुन)

आरोग्य केंद्रांमार्फत मोफत केल्या जाण्याची व्यवस्था आसावी.

१३.डायलिसिस सेवा सार्वजनिक आरोग्यकेंद्रात उपलब्ध व्हावी.

१४.सिकलसेल अॅनेमिया,फायलेरिया अशा विशिष्ठ आजारांबाबतच्या चांचण्या व उपचार व समुपदेशन प्राथमिक केंद्रांत मिळावे.

१५सध्या जलवायुपरिवर्तनाचा–क्लायमेट क्रायसिसचा परिणाम म्हणून तापमानांत मोठी वाढ होते आहे.त्यामुळे उन्हातान्हांत कामकरणारे बांधकाम मजूर,फेरीवाले,शेतमजूर याच्या जीवाला मोठा धोका निर्माण झालेला आहे.अशा क्लायमेट व्हिक्टीमसना रोजगार भत्ता दिला जावा.कामाच्या स्थळापासुन जवळ २० मिनिटांच्या आंत किमान ईमर्जन्सि आरोग्यसेवा मिळण्याची सोय उपल्बध्द करण्यांत यावी व त्यांचे जीव वाचवावेत.यादृष्टीने योग्य आर्थिक तरतूद व आवश्यक धोरण सुधारणा करण्यात याव्यांत याकरिता आम्ही पाठपुरावा करुं.

१६.अवकाळी पाऊस,कमी वेळांत मुसळधार पाऊस,पूर या सर्वामुळे ग्रस्त लोकांना केवळ आपतकालीन विभागाच्या मार्फत नैसर्गिक आपत्ती म्हणून तात्पुरते स्थलांतर करणे एवढीच शासनाची जबाबदारी नाही तर त्यांना क्लायमेट विस्थापित मानून मानसिक व शारीरीक आरोग्यसेवा व पोषण तर दिले जावेच शिवाय त्यांचे योग्य पुनर्वसन केले जावे यासाठी आम्ही पाठपुरावा करुं.

१७.केरळमधील एन्डोसल्फान सारख्या घातक रसायन कारखान्यां मुळे होणा–या प्रदुषणाने ग्रस्त कामगार व परिसरातील परिवारांना सर्व आवश्यक आरोग्यसेवा मोफत मिळतील याची व्यवस्था करावी व योग्य पुनर्वसन मिळावे.कामाच्या ठिकाणी सुरक्षेच्या सर्व सोयीसुविधा व आपत्कालीन यंत्रणा कार्यरत असणे बंधनकारक असावे असा आम्ही आग्रह धरुं.

१८.तृतीयपंथीयांना भेदभावरहित व सन्मानजनक वागणूक व आरोग्यसेवा मिळाव्यांत.जिल्हास्तरावर त्यांच्यासाठी स्वतंत्र खोलित बेड आरक्षित असावेत.

१९.तृतीयपंथियासाठी समुपदेशन व लिंगबदल शस्त्रक्रिया यांची व्यवस्था सार्वजनिक आरोग्य यंत्रणेकडे असावी, याकरिताच्या लढ्याला आम्ही साथ देऊं.

२०.सर्वाधिक महत्वाचे म्हणजे या सर्व सुविधा उपलब्ध करुन देण्याकरिता आरोग्याचे बजेट तातडीने दुप्पट तरी केले जावे अशी आमची मागणी आहे.

एकंदर सार्वजनिक आरोग्यसेवा सुदृढ करणे,खाजगी हास्पिटलस् वर व औषधांच्या दरांवर नियंत्रण करणे,आरोग्य कर्मचा–यांची नियुक्ती करणे,कंत्राटीकरणाला आळा घालणे व सामाजिक कार्यकर्त्यांचा निगराणी समित्यांमध्ये समावेश करणे यासाठी आम्ही सर्व सहभागी कार्यकर्ते एकमेकांना साथ देत लढू.

kolhekar.suhas@gmail.com

विषेश

शिक्षणाचे खाजगीकरण बहुजन समाजाचे मरण

संदीप रेणुका परशुराम पाटील

भाजप प्रणित केंद्र आणि राज्य सरकारने शिक्षणाचे खाजगीकरण सुरू केलेले आहे आणि त्याचे थेट परिणाम आता दिसू लागलेले आहेत. शिक्षणाचे खाजगीकरण आणि सरकारचे जाणीवपूर्वक शिक्षणाकडे दुर्लक्ष केल्यामुळे आज रायगड जिल्ह्यातील ३०० अधिक शाळा बंद झालेल्या आहेत आणि महाराष्ट्रातील १४ हजार शाळा बंद होणार आहेत. तसेच ५०% गावातील ५०% मुले खाजगी शाळेत (सेमी इंग्लिश व इंग्रजी माध्यम) दाखल झाल्यामुळे गावा–गावातील शाळा ओस पडत चाललेल्या आहेत. शिक्षकांचा अपुरा पुरवठा, शिक्षकांना अशैक्षणिक कामात गुंतविणे, सरकारचे शिक्षणाकडे दुर्लक्ष यामुळे शालेय शिक्षणाचा दर्जा घसरलेला आहे त्यामुळेच नाईलाजाने पालकांनी आपल्या मुलांना खाजगी शाळेत दाखल केलेले आहे. शिक्षणाचे खाजगीकरण झाल्यामुळे खाजगी शाळा मोठ्या प्रमाणात उघडण्यात आलेल्या आहेत. खाजगी शाळेतील सुंदर इमारत आणि तेथील शैक्षणिक वातावरण पाहून पालकांनी आपल्या मुलांच्या भविष्यापोटी आपल्या मुलांना खाजगी शाळेत दाखल केले आहे. श्रीमंतांनी पाहिलेले स्वप्न गरीब सुद्धा पाहू लागलेला आहे आणि म्हणूनच मुलांचे भविष्य डोळ्यासमोर ठेवून आज बहुजन समाजातील पालक आपल्या मुलांना खाजगी शाळेत दाखल करीत आहे परंतु आज खाजगी शाळेचा शैक्षणिक खर्च मोठ्या प्रमाणात आहे. पहिलीच्या मुलाचा शैक्षणिक खर्च ३५ ते ४० हजार रुपये, ११ वी आणि १२ वी चा शैक्षणिक खर्च २ ते ३ लाख रुपये, एमबीएच्या खर्च ५ ते ७ लाख रुपये, डॉक्टर होण्यासाठी शैक्षणिक खर्च ६० ते ७० लाख रुपये येतो. याचा अर्थ गरीब बहुजन समाजातील मुले अकरावी बारावी नंतर शिकू शकणार नाहीत. शिक्षणाच्या खाजगीकरणामुळे बहुजन समाजातील मुले शिक्षणाच्या मुख्य प्रवाहाच्या बाहेर फेकली गेलेली आहेत.

बहुजन समाजातील मुलांना शिक्षण मिळावे म्हणून महात्मा फुले यांनी शाळा काढली. शिक्षणाचे सार्वत्रिकरण व्हावे म्हणून १८८२ साली 'हंटर कमिशन' पुढे मोफत शिक्षण मिळावे असा आग्रह महात्मा फुलेंनी धरला. राजर्षी शाहू महाराजांनी सक्तीचे प्राथमिक शिक्षण करून आर्थिक बजेटच्या २३ टक्के बजेट शिक्षणावर केले. 'शिका संघटित आणि संघर्ष करा' हा मंत्र डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी देऊन मिलिंद विद्यापीठ सुरू केले. महात्मा गांधी यांनी 'तालीम शाळा' सुरू केली. बडोद्याचे सयाजी गायकवाड महाराजांनी 'सक्तीचे प्राथमिक शिक्षण' केले. स्वातंत्र्यानंतर १९५२ नंतर पंडित नेहरूंनी गावागावात शाळा सुरु केल्या. २००५ साली खेडेगावातील प्रत्येक गावात वस्तीशाळा उघडून गोरगरिबांना शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणण्यात आले. २००९ साली काँग्रेस प्रणित डॉ. मनमोहन सिंग सरकारने शिक्षण हक्क कायदा केला. मात्र २०१४ नंतर भाजप प्रणित नरेंद्र मोदी सरकार आणि भाजप प्रणित महाराष्ट्रातील देवेंद्र फडणवीस सरकार यांनी शिक्षणाकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष करून शिक्षणाचे खाजगीकरण केले.

आज कंत्राटी कामगाराचे मासिक वेतन १० ते १२ हजार रुपये, इको–मिनीडोअर, रिक्षा चालक यांना महिन्याला १० ते १२ हजार रुपये मिळतात. वीट भट्टी कामगार, कोळसा भट्टी कामगार, ऊसतोड कामगार, घर कामगार, रस्त्यावरील भाजीविक्रेते छोटे दुकानदार यांचे मासिक उत्पन्न ५ ते ६ हजार रुपये आहे. अशा परिस्थितीमध्ये बहुजन समाजातील मुले शिकणार कशी, हाच मोठा प्रश्न निर्माण झालेला आहे. बहुजन समाजातील अनेकांनी आपल्या जमिनी विकल्या आहेत. आज उत्पन्नाचे कोणतेही साधन त्यांच्याकडे राहिलेले नाही अशा परिस्थितीमध्ये शिक्षणाचे खाजगीकरण झाल्यामुळे बहुजन समाज हा पूर्णत: शिक्षणाच्या मुख्य प्रवाहाच्या बाहेर फेकला गेलेला आहे याची जाणीव असताना सुद्धा सरकार शिक्षणाकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष करीत आहे. शिक्षणाच्या खाजगीकरणामुळे ज्यांच्याकडे पैसा आहे त्यांचीच मुलं शिकणार आहेत आणि गरिबांची मुलं ही शिकू शकणार नाहीत. याचा अर्थ रूप बदलून नव्या ब्राह्मणीकरणची नवीन वर्णव्यवस्था आलेली आहे.

संच मान्यता जीआर २०२४ नुसार महाराष्ट्र सरकार जिथे मुलांची पटसंख्या कमी आहे. तेथील जास्तीचे शिक्षक दुसऱ्या शाळेत पाठवणार आहेत. परंतू शिक्षणाचा दर्जा घसरल्यामुळेच पटसंख्या कमी झाली याचा विचार सरकार करीत नाही. केंद्र सरकारच्या राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० मध्ये शिक्षणाचे सार्वत्रिकरणाचे नसून शाळा आणि महाविद्यालय बंद करणे हेच प्रयोजन दिसते. महाराष्ट्र सरकार सीबीएससी बोर्ड आणि शिक्षकांचा ड्रेस कोड बदलणे याविषयी बोलते परंतु शिक्षक भरती करणे, शाळेचे शैक्षणिक दर्जा वाढविणे, शाळेची सुंदर इमारत बांधणे, शैक्षणिक वातावरण निर्माण करणे याविषयी कोणत्याही प्रकारे वाच्यता करत नाही. याउलट महाराष्ट्र सरकारच्या आर्थिक बजेटमध्ये शिक्षणाला कात्री लागलेली दिसते.

भारत सरकारचा गेल्या पाच वर्षात शिक्षणावर जी.डी.पी.च्या ३% च्या आसपास खर्च राहिला आहे. जगातील अनेक देश शिक्षणावर भारतापेक्षा जास्त खर्च करतात. उदा. भूतान, झिम्बाब्वे, स्वीडन या देशाचा खर्च ७.५% आहे. कोस्टारिका व फिनलँड ७% , द.आफ्रिका, ब्राझील ६% नेदरलॅंड ५.५%, मलेशिया, केनिया, मंगोलिया, कोरिया, अमेरिका ५% खर्च शिक्षणावर करतात. कस्तुरीरंगन समितीने शिक्षणावर जीडीपीच्या ६% खर्च करावे असे सांगितले आहे; परंतु केंद्र आणि राज्य सरकार फक्त ३% खर्च शिक्षणावर करते. शिक्षणावर जास्त खर्च करण्यासाठी सरकारकडे पैसे नाही, परंतु मोठमोठ्या उद्योगपतींना सरकार कर्जमाफी करत आहे. भारतापेक्षा अप्रगत देश उदाहरणार्थ मालदीव, माल्टा, मोरक्को, नामेबिया, रवांडा, दक्षिण आफ्रिका इत्यादी देशांमध्ये सुद्धा ५ ते ६ टक्के खर्च शिक्षणावर केले जाते. मग महासत्तेचे स्वप्न पाहणाऱ्या व तिसऱ्या क्रमांकाचे अर्थव्यवस्था होऊ पाहणाऱ्या भारत शिक्षणावर जास्त खर्च का करत नाही ?

बहुजन समाजासाठी शिक्षण हेच आपले शस्त्र राहणार आहे, ज्याच्याकडे शिक्षण नाही तो गुलाम होणार आहे म्हणूनच बहुजन समाजाने शिक्षण घेतलेच पाहिजे यासाठी शिक्षण हे मोफत मिळणे गरजेचे आहे. सरकार बहुजन समाजाकडून मोठ्या प्रमाणात कर गोळा करते आणि त्याचे जास्तीत जास्त फायदे श्रीमंत आणि उद्योगपतींना होत आहेत मात्र बहुजन समाजाकडून घेतलेल्या कराचा उपयोग बहुजन समाजाच्या मुलांच्या शिक्षणासाठी सरकार करत नाही म्हणूनच बहुजन समाजातील मुले ही शिक्षणाच्या मुख्य प्रवाहाच्या बाहेर फेकली जात आहेत. बहुजन समाजातील मुले शिकली तर ते सरकारला प्रश्न विचारतील आणि कोणीही प्रश्न विचारू नये म्हणूनच शिक्षणाचे खाजगीकरण करून बहुजन समाजाला शिक्षणापासून दूर केले जात आहे.

8446345736

(निवेदन: पान ८ वरुन)

उत्सुक आहोत.

तुमच्या माहितीसाठी आणि आवश्यक कारवाईसाठी हैदराबाद येथे आयोजित करण्यात आलेल्या राष्ट्रीय अधिवेशनात (२ मार्च, २०२५) राष्ट्रीय आरोग्य अधिकार समन्वयाने पारित केलेले प्रमुख प्रस्ताव व मागण्या सोबत जोडल्या आहेत.

तुमच्या सकारात्मक आणि तत्पर उत्तराच्या आणि कृतीच्या अपेक्षेत

प्रत रवाना:

आरोग्य मंत्री, महाराष्ट्र राज्य

आरोग्य विभागाचे प्रधान सचिव डॉ .....

जिल्हाधिकारी

जिल्हा वैद्यकीय व आरोग्य अधिकारी डॉ.....

संपर्क: ९४२२९८६७७१, ८८५८४६०५०१, ९९७१२४५९८८

vaibhaviadhav149@gmail.com

(खास वृत्तांत: पान १३ वरुन)

कोणत्याही प्रकारे आपला पाठिंबा द्या. सरस्वती यांना आपण आश्वासन द्यायला हवं की, हा मुद्दा आपला सर्वांचा आहे आणि आपण यावर एकत्र काम करू.

संस्कृतिक क्रांतीशिवाय, सांस्कृतिक नाती, प्रेम, आपुलकी आणि करुणेशिवाय कोणतंही सामाजिक आंदोलन अपूर्ण राहील. महिलांनी या क्रांतीत महत्त्वाची भूमिका बजावली आहे आणि पुढेही बजावत राहतील. मात्र, पुरुषांनाही आता यात सामील व्हायला हवं आणि या क्रौर्य, द्वेष आणि हिंदुत्वाच्या चुकीच्या व्याख्येचा विरोध करायला हवा. संस्कृतीच्या क्रांतीला समजून घेतल्याशिवाय, तिची योग्य व्याख्या केल्याशिवाय ही लढाई लढता येणार नाही.

vaibhaviadhav149@gmail.com

चर्चा

‘वक्फ’चा इतिहास, आधुनिक भारतामधील कायदे, बदल, वादाचे मुद्दे व सर्वोच्च न्यायालयाची भूमिका...

श्रीनिवास जोशी

‘वक्फ’ म्हणजे इस्लामी कायद्याखाली धर्मादयासाठी आणि समाजकार्यासाठी दिलेले दान. एकदा हे दान दिले की, इस्लामी कायद्याप्रमाणे ते परत घेता येत नाही, आणि हे दान समाजाला मिळाले की, त्यालाही ते दुसऱ्या कुणाला विकता येत नाही. Once a Waqf always a Waqf! याला इंग्रजीमध्ये ‘Inalianable’ हा शब्द आहे. मराठीमध्ये ‘अहस्तांतरणीय’ ! मुस्लीम जगतात ही प्रथा साधारणपणे नवव्या शतकापासून चालत आलेली आहे. भारतात इस्लाम आल्यापासून ही प्रथा अर्थातच भारतातसुद्धा सुरू झाली. अनेक मुसलमान राजे, सांस्थानिक आणि अगणित मुस्लिम कुटुंबे यांनी गेल्या अनेक शतकात ही दाने दिलेली आहेत. मुस्लीम समाजाला दिल्या गेलेल्या या मालमत्तांच्या ‘मॅनेजमेंट’ची जबाबदारी वक्फ बोर्डांकडे आहे. ही दाने मुख्यत्वेकरून जमिनींच्या स्वरूपात होती. मशिदी बांधणे, विविध धर्मादायाची कामे करणे, इत्यादी कार्यांसाठी या जमिनी वापरल्या जात राहिल्या.

मुस्लीम समाजात विविध कौटुंबिक जमिनी आणि विविध प्रॉपर्टीज वक्फसाठी दान दिल्या जात राहिल्या. हळूहळू वक्फ म्हणून प्रचंड प्रॉपर्टी जमा झाली. भारतात सुमारे आठ लाख एकर जमीन वक्फ म्हणून जमा झालेली आहे. पुढे भारतात इंग्रजांचे राज्य आल्यावर या वक्फच्या संदर्भात आधुनिक कायदा करण्याची गरज निर्माण झाली. त्यामुळे इंग्रजांनी १ ९ १ ३ साली ‘वक्फ व्हॅलिडेशन ॲक्ट’ नावाचा कायदा बनवला. या कायद्याप्रमाणे १ ९ १ ३ पासून मुसलमान समाजातील लोकांचा आपली मालमत्ता वक्फ करण्याचा हक्क मान्य केला गेला. थोडक्यात, वक्फच्या इस्लामी पद्धतीला या कायद्याद्वारे आधुनिक कायदे पद्धतीमध्ये आणण्यात आले. नंतर १ ९ २ ३ साली अजून एक कायदा केला गेला. त्यामध्ये वक्फ प्रॉपर्टीज कशा मॅनेज केल्या जाव्यात, या विषयी ‘गाईड लाइन्स’ घालून देण्यात आल्या. वक्फ मालमत्तांच्या मॅनेजमेंटची जबाबदारी ज्या मॅनेजरवर असते, त्याला ‘मुतवल्ली’ म्हणतात. या मुतवल्लींनी या वक्फ प्रॉपर्टीजचे अकाऊंटिंग कसे करावे, काय काय हिशोब कसे कसे रिपोर्ट करावेत, हे या कायद्यात सांगितले गेले होते. त्याशिवाय हे अकाउंटिंग आणि रिपोर्टिंग नीट केले नाही, तर काय शिक्षा केल्या जाव्यात, हेसुद्धा या कायद्याने सांगितले.

त्यानंतर १ ९ ३ ० साली इंग्रजांनी अजून एक कायदा केला. या कायद्याने १ ९ १ ३च्या आधी ज्या प्रॉपर्टीज वक्फ केल्या गेल्या होत्या, त्यांचा समावेश १ ९ १ ३च्या कायद्यामध्ये केला गेला. पुढे भारत स्वतंत्र झाल्यावर १ ९ ५ ४मध्ये भारत सरकारने वक्फ कायदा पास केला. यामध्ये ‘सेंट्रल वक्फ काउन्सिल’ स्थापन केले गेले. भारत सरकारला वक्फच्या संदर्भात सल्ला देण्याचे काम या काउन्सिलला देण्यात आले. हे काउन्सिल नेमण्याचा हक्क केंद्र सरकारने आपल्याकडे ठेवला. त्याचप्रमाणे, प्रत्येक राज्यामध्ये ‘स्टेट वक्फ बोर्ड’ स्थापन करण्यात आले. त्या त्या राज्यामधल्या वक्फ प्रॉपर्टीजचे संरक्षण करणे आणि त्यांची मॅनेजमेंट करणे, हे काम या राज्यस्तरीय वक्फ बोर्डाला देण्यात आले. स्टेट वक्फ बोर्ड राजधानीच्या ठिकाणी असणार, म्हणून मग त्यांना मदत करायला प्रत्येक जिल्ह्यामध्ये वक्फ बोर्ड स्थापन करण्याचे ठरले. जिल्ह्याजिल्ह्यात असलेली ही वक्फ बोर्डस् स्थापना करण्याचे काम स्टेट वक्फ बोर्डाकडे देण्यात आले. स्टेट वक्फ बोर्डाची नेमणूक मात्र राज्य सरकार करणार असे ५ ४च्या वक्फ कायद्याने सांगितले.

या शिवाय काही वाद उत्पन्न झाले, तर ते खटले ऐकण्यासाठी आणि त्यांच्यावर निर्णय देण्यासाठी प्रत्येक राज्यात ‘वक्फ ट्रिब्युनल’ स्थापन करण्यात आली. वक्फ ट्रिब्यूनलने दिलेला निर्णय कुणा पक्षाला मान्य झाला नाही, तर अर्थातच उच्च न्यायालयात आणि सर्वोच्च न्यायालयात जायचा मार्ग त्या पक्षाला मोकळा ठेवला गेला. इथं एक लक्षात घ्यायला हवे की, वक्फ काउन्सिल, वक्फ ट्रिब्युनल आणि वक्फ बोर्ड, या सगळ्या संस्था भारताच्या आधुनिक कायद्यांच्या कक्षेमध्ये आणल्या गेल्या आहेत. त्यांच्यावर भारतीय राज्यघटनेची पूर्ण पकड आहे. या संस्था भारतीय राज्यटनेच्या पूर्णपणे अंकित आहेत. वक्फ ही काही मुल्ला–मौलवींनी इस्लामी कायद्याप्रमाणे चालवलेली मध्ययुगीन संस्था नाही.

१ ९ ९ ५च्या कायद्याप्रमाणे वक्फ काऊन्सिल, वक्फ बोर्ड, मुतवल्ली आणि वक्फ ट्रिब्युनल यांची कार्यक्षेत्रे आणि अधिकार जास्त खोलात जाऊन आखून दिले गेले. या शिवाय एक महत्त्वाची गोष्ट म्हणजे या कायद्याद्वारे वक्फ प्रॉपर्टीजचे रजिस्ट्रेशन आवश्यक केले गेले. दरम्यान १ ९ ५ ४ नंतर वक्फ बोर्ड आणि त्यांच्या

कार्यपद्धतीवर अनेकदा टीका केली गेली. अगदी मुसलमान समजाकडूनही या बाबत टीका केली गेली. 'मुस्लीम सत्यशोधक समाजा'ने वक्फ बोर्डाकडे असलेला पैसा गरीब मुसलमान, मुसलमान स्त्रिया, तलाकपीडित स्त्रिया आणि आधुनिक शिक्षण यांच्यावर खर्च केला गेला पाहिजे, अशी मागणी केली. 'मुस्लीम सत्यशोधक समाजा'ने आक्षेप घेतला की, वक्फ बोर्डांचा पैसा फक्त मशिदी, मदरसे आणि कब्रस्तानांवरच खर्च केला जातो.

दरम्यान राजीव गांधी सरकार असताना शाहबानो पोटगी प्रकरण झाले. या पार्श्वभूमीवर राजीव गांधी सरकारने १९८६ साली मुस्लीम महिलांच्या पोटगी संदर्भात एक कायदा पास केला होता. त्यात तलाकपीडित मुस्लीम स्त्रियांना वक्फ बोर्डांनी मदत करावी, अशी अपेक्षा व्यक्त केली होती. पुढे मनमोहनसिंगह सरकारने २००५ साली मुसलमान समाजाच्या सामाजिक, आर्थिक आणि शैक्षणिक अवस्थांचा अभ्यास करण्याकरता न्यायमूर्ती सच्चर कमिटी नेमली होती. या कमिटीनेसुद्धा वक्फ बोर्डाकडे असलेला पैसा आधुनिक सामाजिक, आर्थिक आणि शैक्षणिक कार्यांसाठी खर्च करावा, अशी अपेक्षा व्यक्त केली होती. परंतु या अपेक्षांकडे सगळ्या वक्फ बोर्डांनी दुर्लक्ष केले, असा आरोप आज 'मुस्लीम सत्यशोधक समाजा'सह अनेक सामाजिक संस्था करत आहेत.

विद्यमान सरकारने पास केलेल्या कायद्याकडे आता येऊ. या नवीन बिलामध्ये काही चांगल्या गोष्टी आहेत. याची काही उदाहरणे देता येतील. पहिले म्हणजे वक्फ बोर्डांच्या कामकाजामध्ये आणि अकाउंट्समध्ये जास्त पारदर्शकता आणली जावी. या साठी इलेक्ट्रॉनिक उपकरणे वापरली जावीत. दुसरे म्हणजे वक्फकडे जमा होणारे पैसे गरीब गरजू मुसलमान आणि पीडित स्त्रियांवर खर्च केले जावेत, आणि तिसरे म्हणजे वक्फ बोर्डामध्ये मुस्लीम स्त्रियांना प्रतिनिधित्व दिले गेलेच पाहिजे. फैजान मुस्तफा हे अत्यंत उदारमतवादी कायदेतज्ज्ञ आहेत. त्यांनी आणि अनेक उदारमतवादी मुस्लीम संस्थांनी या गोष्टींचे स्वागत केले आहे. फैजान मुस्तफा यांनी तर नवीन कायद्याद्वारे गैरमुसलमान लोकांची वक्फ बोर्डावर होणारी नेमणूक ही गोष्टसुद्धा स्वागतार्ह गोष्ट मानली आहे. गैरमुसलमान लोक वक्फ बोर्डावर आल्यामुळे हिंदू समाजाचे वक्फविषयीचे अनेक गैरसमज दूर होतील, असे त्यांचे मत आहे!

नवीन वक्फ बिलामधल्या स्वागतार्ह गोष्टी पाहून झाल्यावर आपण या कायद्यामधील मुस्लीम समाजाला आक्षेपार्ह वाटत असलेल्या गोष्टींकडे जाऊ. मुस्लीम समाजाचे आक्षेप लक्षात घेऊ या. नवीन बिलाबद्दल तीन मुख्य आक्षेप आहेत–

१) वक्फ बिलामध्ये वक्फ काउन्सिल आणि वक्फ बोर्डावर गैरमुस्लीम सदस्य असण्याची तरतूद आहे. मुस्लीम समाजातर्फे मांडला जातो आहे की, वक्फ ही आमची धार्मिक संस्था आहे; या संस्थेमध्ये गैरमुस्लीम पदाधिकारी तुम्ही कसे आणू शकता? असे करण्याचे कारण काय? हा मुद्दा अतिशय महत्त्वाचा आहे. आपापल्या धार्मिक संस्था स्थापन करण्याचा आणि चालवण्याचा अधिकार भारताच्या घटनेच्या २६व्या कलमाने भारतामधील सगळ्या नागरिकांना दिला आहे. हा हक्क भारताच्या घटनेने नागिरिकांना दिलेल्या मूलभूत हक्कांपैकी एक आहे. मूलभूत हक्कांवर फारशी गदा आणता येत नाही, हे आपल्या सगळ्यांनाच माहीत आहे. जिवंत राहण्याचा हक्क, संपत्ती धारण करण्याचा हक्क, विचारस्वातंत्र्याचा हक्क, धार्मिक स्वातंत्र्याचा हक्क असे हे सगळे मूलभूत हक्क आहेत. हे हक्क हिरावून घेतले गेले, तर मानवी जीवनाला काही अर्थ उरत नाही. या हक्कांशिवाय माणसाला आपल्याच देशामध्ये सुखाने राहता येत नाही. म्हणून घटनेने सांगितले आहे की, अगदी अपवादात्मक परिस्थिती सोडली, तर सरकारला नागरिकांच्या या हक्कांवर गदा आणता येणार नाही. सरकार किंवा इतर कोणीही या हक्कांवर गदा आणू लागले तर थेट सुप्रीम कोर्टाकडे दाद मागता येते. घटनेच्या या तरतुदीनुसार अशी दाद सर्वोच्च न्यायालयाकडे या नवीन बिलाबद्दल मागितली गेली. या मध्ये मुसलमान समाजाच्या धार्मिक आधिकारांवर गदा आणली गेली आहे, अशी तक्रार आहे. सुनावणीच्या पहिल्याच दिवशी नवीन वक्फ बोर्डावर गैरमुसलमान व्यक्तींच्या नेमणुकीविषयी प्रश्न उपस्थित झाला. याबाबतीत मुख्य न्यायाधीश संजीव खन्ना यांनी सरकारची बाजू मांडणाऱ्या तुषार मेहता यांना एक साधा प्रश्न विचाराला. ते म्हणाले की तुम्ही गैरमुसलमान लोकांना वक्फ बोर्डावर नेमत आहात, असे गैर हिंदू लोक हिंदू संस्थानांवर नेमले गेलेले तुम्हाला चालतील का?

२) दुसरा मुद्दा 'वक्फ बाय यूजर'चा म्हणजे वहिवाटीने वक्फ असलेल्या मालमत्तांचा. कित्येक वक्फ मालमत्ता शतकानुशतके वहिवाटीमध्ये आहेत. रजिट्रेशनचा कायदा सुरू होण्याच्या आधीपासूनच्या या मालमत्ता आहेत. असदुद्दीन ओवैसी यांच्या म्हणण्याप्रमाणे जवळ जवळ ८० टक्के वक्फ मालमत्तांची रजिस्ट्रेशन झालेली नाहीत. 'टाईम्स ऑफ इंडिया'च्या म्हणण्याप्रमाणे भारतात सुमारे चार लाख वक्फ मालमत्ता 'वक्फ बाय यूजर मालमत्ता' आहेत. नवीन कायदा म्हणतो की, वहिवाटीप्रमाणे वक्फ असलेल्या मालमत्ता वक्फ म्हणून संरक्षित केल्या जातील. पण पुढे हा कायदा म्हणतो की जिथे, जिथे वाद आहेत त्या मालमत्ता वक्फ म्हणून संरक्षित केल्या जाणार नाहीत. म्हणजे उद्या कुणी 'वक्फ बाय यूजर' प्रॉपर्टीवर दावा सांगितला, तर ती वक्फ प्रॉपर्टी वक्फ म्हणून

संरक्षित राहणार नाही, असे समजायचे का? हा फार मोठा वादाचा मुद्दा आहे. यावर विविध कायदेतज्ज्ञांची उलटसुलट मते आहेत, पण मुस्लीम समाजात 'वक्फ बाय यूजर' मालमत्तांविषयी निश्चितच चिंता उत्पन्न झालेली आहे, ही गोष्ट आज नाकारता येत नाही. बहुतांश मुसलमान समाजाचे म्हणणे आहे की, वक्फ मालमत्ता आमच्याकडून हिसकावून घेण्यासाठीची ही चाल आहे.

या बिलाच्या समर्थकांचे म्हणणे आहे की, वहिवाटीच्या नावाखाली अनेक वक्फ बोर्डांनी खोडसाळपणा करून अनेक सरकारी जमिनी वक्फ म्हणून घोषित केलेल्या आहेत. त्यामुळे सगळ्या वहिवाटीने वक्फ असलेल्या जमिनी वक्फ म्हणून संरक्षित करता येणार नाहीत. याच्याही पुढे जाऊन या लोकांचे असे म्हणणे आहे की, बहुतेक वक्फ बोर्ड भ्रष्ट आहेत. 'वक्फ बाय यूजर'चा फायदा उठवून हे लोक अनेक खाजगी जमिनींवरसुद्धा हक्क सांगतात आणि त्यांची डेव्हलपमेंट रोखून धरतात. त्यासाठी डेव्हलपर्सकडून मोठ्या मोठ्या रकमा उकळून आपले वक्फचे क्लेम सोडून देतात.

३) याच्या पुढचा वादाचा मुद्दा आहे की, पूर्वीच्या कायद्याप्रमाणे जिल्ह्याच्या कलेक्टरला वक्फच्या जमिनींचे फक्त सर्व्हे करण्याचे अधिकार होते. आता जिल्हाधिकाऱ्याला 'सरकार विरुद्ध वक्फ बोर्ड' अशा वादात जमीन वक्फची आहे की नाही, याबाबत निर्णय द्यायचा अधिकार दिला गेला आहे.

यावर अनेक लोक म्हणतील यात काय चूक आहे? जिल्हाधिकाऱ्याने चुकीचा निर्णय दिला गेला, तर अपील करता येणार आहेच की! मुस्लीम समाजाचे यावर म्हणणे असे की, एखादी जमीन वक्फ आहे की नाही हे ठरवण्याचे इतके मोठे निर्णय इतक्या छोट्या पातळीवर का आणता? तेसुद्धा एका कार्यकारी अधिकाऱ्याच्या पातळीवर. जिल्हाधिकारी हा सरकारच्या डायरेक्ट नियंत्रणाखाली असतो. त्याचे पोस्टिंग सरकारने केलेले असते, त्याचे प्रमोशन सरकारच्या हातात असते. तो सरकारच्या विरुद्ध निर्णय देताना दबावरहित कसा राहू शकेल?

मुस्लिमांचे म्हणणे आहे की, अशा माणसाकडे इतके महत्त्वाचे न्यायदानाचे आधिकार का दिले गेले? हे अधिकार न्यायसंस्थेकडेच असले पाहिजेत. न्यायसंस्था या काही सरकारच्या थेट नियंत्रणाखाली नसतात. त्यामुळे त्या योग्य निर्णय करण्याच्या परिस्थितीमध्ये असतात. जिल्हा स्तरावरच्या आधिकाऱ्याला इतके मोठे अधिकार देण्यामुळे बहुतेक वक्फ मालमत्तांच्या बाबत फार मोठे गोंधळ उडतील, असे मुस्लिम कायदेतज्ज्ञांचे म्हणणे आहे.

या तीन मुख्य मुद्द्यांशिवाय अजून एका मुद्द्यावर अस्वस्थता आहे. या नवीन कायद्याने जुन्या कायद्यामधील एक फार महत्त्वाचे कलम रद्द केले आहे, असा मुस्लीम समाजाचा आक्षेप आहे. १९९५च्या कायद्यामधले ४०वे कलम वादग्रस्त ठरले होते. यात वक्फ बोर्ड एखादी जमीन 'वक्फ जमीन' म्हणून घोषित करू शकत होते. हे कलम ठेवण्याचे कारण असे होते की, शतकानुशतके वक्फ प्रॉपर्टीज नुसत्याच दान केल्या गेलेल्या होत्या. त्यांच्याबाबत फारशी कागदपत्रे उपलब्ध नव्हती. अगदी वक्फ बोर्डांकडेसुद्धा ही कागदपत्रे उपलब्ध नव्हती. अशा दान केलेल्या जमिनी केवळ दुर्लक्ष होऊन वक्फच्या परिघाच्या बाहेर राहू नयेत, म्हणून हे कलम ठेवण्यात आलेले होते. अर्थात कुठल्याही वक्फ बोर्डाने एखादी जमीन वक्फ म्हणून घोषित केली, तरी त्या निर्णयाच्या विरोधात वक्फ ट्रिब्यूनलमध्ये अपील करता येत होते आणि तो निर्णय मान्य झाला नाही, तर रिट पिटीशन करून उच्च न्यायालयात जाता येत होते. मात्र ट्रिब्युनलच्या निर्णयाच्या विरुद्ध कुठल्याही न्यायालयात जाता येत नाही, असा चुकीचा व खोडसाळ प्रचार सोशल मीडियावर केला गेला.

खरे तर अशी काही परिस्थिती नव्हती. १९९५च्या कायद्यामधली प्रोव्हिजन ८३ (३) पाहिली, तर ही गोष्ट आपल्या लक्षात येईल. यात स्पष्टपणे लिहिलेले आहे की, वक्फ ट्रिब्युनलच्या निर्णयाविरुद्ध उच्च न्यायालयामध्ये ६० दिवसांत अपील दाखल करता येईल. अजून एक गोष्ट लक्षात ठेवली पाहिजे. कुणा व्यक्तीच्या जमिनीबद्दल निर्णय दिला गेला असेल, तर घटनेच्या २२६ व्या कलमाप्रमाणेसुद्धा आपल्याला कधीही रिट पिटीशन दाखल करता येते. मग तो निर्णय सरकारचा असो, अथवा कुठल्या बोर्डाचा असो, अथवा कुठल्या ट्रिब्युनलचा!

२२६व्या कलमाद्वारे कुठल्याही नागरिकाचा कुठलाही मूलभूत हक्क धोक्यात येत असेल, तर त्याला किंवा तिला उच्च न्यायालयात रिट पिटीशन दाखल करता येते. वक्फ ट्रिब्युनलने कुणा व्यक्तीच्या मालमत्तेबद्दल चुकीचा निर्णय दिला, तर त्या व्यक्तीचा मालमत्ता धारणेचा हक्क धोक्यात येत असल्याने २२६चे हे संरक्षण त्या व्यक्तीला उपलब्ध होते. नवीन बिलात हे १९९५च्या बिलामधले हे ४०वे कलम रद्द केले गेले आहे. या कलमाची आता गरज राहिलेली नाही, असे या बिलाच्या समर्थकांचे म्हणणे आहे. गेले संपूर्ण शतक मुसलमान लोकांना आपल्या वक्फ मालमत्ता शोधण्यासाठी उपलब्ध करून दिले गेले होते. अजून किती काळ द्यायचा? या बिलाच्या समर्थकांचे म्हणणे असे की, गेल्या काही दशकांमध्ये ४० कलमाचा उपयोग फक्त अनेक जमिनींवर हक्क सांगून लोकांना त्रास देण्यासाठी करण्यात येत होता. हे कलम काढण्याला विरोध करणाऱ्या लोकांचे म्हणणे असे की, अपीलात जाता येत असेल तर कलम

(पान ३६ वर)


MS-CIT ने केली किमया,
दाखवली मला AI ची
नवी दुनिया!
१०वी ते १२वी आणि CBSE च्या विद्यार्थ्यांसाठी खास बॅचेस
MS-CIT मध्ये
100 AI Tools शिकून
मी झाले 1000 पट स्मार्ट!
MS-CIT
आंतरराष्ट्रीय दर्जाचा परिपूर्ण कंप्यूटर कोर्स
mscit.mkcl.org
१०वी ते १२वी आणि CBSE च्या विद्यार्थ्यांसाठी खास बॅचेस
MS-CIT मध्ये AI Tools चे शिक्षण
शासकीय सेवेत प्रवेशासाठी MS-CIT अनिवार्य
२४ वर्षांची समृद्ध शैक्षणिक परंपरा
१ कोटी ६५ लाखाहून अधिक विद्यार्थी
शिका २५०+ मूलभूत आणि ॲडव्हान्स स्किल्स
महाराष्ट्रातील ४५००+ अधिकृत केंद्रांमध्ये उपलब्ध
MSBTE आणि MKCL यांचे संयुक्त प्रमाणपत्र
करिअर आणि जॉब ओरिएंटेड क्लिक कोर्सेस।
MKCL
KLiC Courses

(चर्चा : पान ३४ वरुन)

राहिल्याने काय फरक पडणार होता?

हे सगळे बघितले, तर आपल्या लक्षात येते की, सगळ्यात वादग्रस्त मुद्दा, एखादी प्रॉपर्टी वक्फ आहे की नाही, हे ठरवण्याचा अधिकार वक्फ बोर्डाकडून काढून जिल्हाधिकाऱ्याला दिला गेल्याचा आहे. अर्थातच यावर तुंबळ रण माजले आहे. मुसलमान लोकांचे म्हणणे आहे की, आता फक्त कुठल्याही वक्फ प्रॉपर्टीवर कलेक्टरच्या ऑफिसमध्ये अर्ज करून क्लेम टाकायचा आहे की, ही वक्फ मालमत्ता नसून सरकारी मालमत्ता आहे. जिल्हाधिकाऱ्याची चौकशी सुरू झाली की, वादग्रस्त मालमत्तेचे 'वक्फ स्टेटस' 'सस्पेंड' होणार. मुसलमान लोकांना भीती वाटते आहे की, या तरतुदीमुळे बहुतांश वक्फ मालमत्ता अगदी हिसकावून घेतल्या गेल्या नाहीत, तरी दशकानुदशके अडकून पडणार आहेत. मुस्लीम समाजमानसामध्ये घर करून राहिलेली ही भीती मुस्लीम कायदेतज्ज्ञ आणि सरकार यांनी लवकरात लवकर घालवली पाहिजे.

अर्थात सर्वोच्च न्यायालयाने या बिलाच्या अंमलबजावणीवर स्थगितीचा निर्णय दिला आहे. यामुळे सरकारला वक्फ काउन्सिल किंवा वक्फ बोर्डावर नव्या बिलाप्रमाणे कुठलीही नियुक्ती करता येणार नाही, आणि कुठलीही वक्फ मालमत्ता ही वक्फ मालमत्ता नाही, हे जाहीर करता येणार नाही. पुढची सुनावणीची तारीख ५ मे ठरली आहे. या सुनावणीमध्ये सर्वोच्च न्यायालय या तीन महत्त्वाच्या वादग्रस्त मुद्द्यांबाबत काय म्हणते, हे पाहायला हवे. नवीन बिलामधील तिन्ही वादग्रस्त मुद्दे घटनाबाह्य आहेत, असे अनेक कायदे–पंडित म्हणत आहेत. आता यावर सर्वोच्च न्यायालय काय म्हणते आहे, यावर सगळ्यांची नजर लागून राहिलेली आहे.

शेवटी आपण हा 'लँड–जिहाद' आहे का, याचा अंदाज घेऊ. त्यासाठी भारतात सुपीक जमीन किती आणि वक्फ बोर्डांकडे जमीन किती, हे पाहू. भारतात साधारण चाळीस ते पन्नास कोटी एकर सुपीक जमीन आहे, असे कृषिमंत्रालयाचे म्हणणे आहे. या माहितीप्रमाणे भारत देशात सुमारे २२० मिलियन हेक्टर म्हणजे सुमारे ५४३ मिलियन एकर होतात. ५४३ मिलयन एकर म्हणजे ५४ कोटी एकर होतात. वक्फकडे सुमारे आठ लाख एकर जमीन आहे, अशी चर्चा आपण गेले चार महिने ऐकत आहोत. ही सगळी आठच्या आठ लाख एकर जमीन सुपीक आहे, असं गृहित धरलं, तरी ती भारतामधील सुपीक जमिनीच्या ०.२ परसेंट आहे, असे दिसते. या पार्श्वभूमीवर हिंदू मंदिरांकडे किती जमीन आहे, हे पाहिले तर चित्र अजून स्पष्ट होते. हिंदू मंदिरांकडे किती जमीन आहे, असे आपण सर्च केले, तर AIवर २० लाख एकर असे उत्तर देते. ही चर्चासुद्धा आपण गेले कित्येक दिवस ऐकत आहोत. या संदर्भात भारतामधील सगळ्याच धर्म-संस्थानांकडे किती किती जमिनी आहेत, याबद्दल भारत सरकारने एक श्वेत-पत्रिका काढावी, म्हणजे या सर्वच चर्चेवर प्रकाश पडेल.

या अतिशय महत्त्वाच्या बिलावर आपण सगळ्यांनीच विचार करायचा आहे. आपल्याला आम्ही वेगवेगळ्या अँगलमधून विषय सांगितला आहे. आपण 'थर्ड अंपायर' व्हायचे आहे आणि या विषयावर आपले मत ठरवायचे आहे. जिल्हाधिकाऱ्याला असे अधिकार देणे, मुसलमानांच्या कायद्याने मान्यता दिलेल्या धार्मिक संस्थांवर गैरमुसलमान लोकांच्या नेमणुका करणे, या गोष्टी योग्य आहेत का, याबाबत नागरीकांनी विचार करायचा आहे. या शिवाय, कित्येक शतके मुसलमान समाजाकडे वहिवाटीने असलेल्या जमिनींबाबत कागदपत्रे मागणे योग्य आहे का, हासुद्धा विचार प्रेक्षकांनी करायचा आहे. या जमिनींवर मशिदी, धर्मादाय संस्था, दरगे आणि कब्रस्ताने आहेत. या स्थानांना धोका निर्माण होणार असेल, तर भारतीय राज्यघटनेच्या उद्देशिके (प्रीअँबल) मध्ये भाईचाऱ्याचा (फ्रॅटर्निटिचा) उद्देश ठळकपणे लिहिला गेला आहे. त्याच्या विरोधात हे बिल जाते आहे का, हे पाहावे लागणार

('अक्षरनामा'च्या सौजन्याने)

(लेखक नाटककार आहेत. त्यांची 'आमदार सौभाग्यवती', 'गाठीभेटी', 'दोष चांदण्याचा' अशी काही नाटके रंगभूमीवर आलेली आहेत. 'टॉलस्टॉयचे कन्फेशन' आणि 'घरट्यात फडफडे गडद निळे आभाळ' अशी दोन पुस्तकेही आहेत.)

sjshriniwasjoshi@gmail.com

To

'शाश्वत विकास न्यास'च्या मालकीचा 'आंदोलन-शाश्वत विकासासाठी'चा हा अंक संपादक, मुद्रक, प्रकाशक मेधा पाटकर यांनी 'श्री गुरुकृपा प्रिंटर्स' १२१, अलाइड इंडस्ट्रियल इस्टेट, राम पंजवानी मार्ग, माहिम, मुंबई ४०००१६ येथे छापून दादर, मुंबई येथून प्रकाशित केला.

प्रेषक : द्वारा केमिकल मजदूर सभा, २९-३०, पहिला मजला, 'ए' विंग, हाजी हबीब बिल्डींग, नायगाव क्रॉस रोड, दादर (पूर्व), मुंबई ४०००१४.